महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती


मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २६७ वे | दिनांक : २३/०९/२०२६ | वार : बुधवार


## सार्वजनिक ठिकाणी फटाक्यांवर बंदी; उल्लंघनावर कठोर कारवाईचे हायकोर्टाचे निर्देश



**मुंबई :** धार्मिक सण, उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान होणाऱ्या ध्वनी व वायू प्रदूषणाची मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. ध्वनी प्रदूषणासंदर्भात दाखल झालेल्या सुमोटो जनहित याचिकेवर मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने सार्वजनिक रस्ते आणि ठिकाणी फटाके फोडण्यास बंदी घालण्याचे तोंडी निर्देश दिले. तसेच मिरवणुकांमध्ये आवाज वाढवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सिलिंडरसारख्या उपकरणांवरही बंदीचे निर्देश देण्यात आले. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. गणेशोत्सव तसेच अन्य धार्मिक उत्सवांमध्ये निर्धारित वेळ आणि ध्वनी मर्यादांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात संगीत वाजवले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने सोमवारी स्वतःहून ही याचिका दाखल करून घेतली होती. त्यानंतर मंगळवारी सकाळ आणि दुपारच्या सत्रात या प्रकरणावर सविस्तर सुनावणी झाली. सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडल्यामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होते. त्याचबरोबर फटाक्यांमधून निघणाऱ्या धुरामुळे वायू प्रदूषणातही वाढ होते. विशेषतः मुंबईसारख्या शहरांमध्ये सप्टेंबर-ऑक्टोबरदरम्यान हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न गंभीर होतो. या पार्श्वभूमीवर फटाक्यांच्या वापरामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामाबाबत न्यायालयाने चिंता व्यक्त केली. सण-उत्सव साजरे करण्यास न्यायालयाचा विरोध नसला, तरी नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून सार्वजनिक रस्ते आणि ठिकाणी फटाक्यांचा वापर रोखण्याची गरज असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले. यासंदर्भात लवकरच सविस्तर लेखी आदेश जारी केला जाणार असल्याचेही न्यायालयाने सांगितले. धार्मिक मिरवणुका आणि विसर्जन सोहळ्यांमध्ये लाऊडस्पीकर किंवा ॲम्प्लीफायरचा वापर करताना नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल. लाऊडस्पीकर वापरण्यासाठी संबंधित प्रशासनाची परवानगी घेणे आवश्यक असून, ही परवानगी मिळाल्याचे पत्रक किंवा फलक दर्शनी भागात लावणे आवश्यक करण्यात येणार आहे. परवानगीचे पत्रक नसताना लाऊडस्पीकरचा वापर केल्यास संबंधित उपकरणांवर कारवाई होऊ शकते. ध्वनीची पातळी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यास उपकरण जप्त करण्यासह कायद्यानुसार कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मिरवणुकांमध्ये आवाज अधिक वाढवण्यासाठी सिलिंडरसारख्या उपकरणांचा वापर केला जात असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. अशा उपकरणांमुळे ध्वनी प्रदूषणात वाढ होत असल्याने त्यांच्या वापरावरही पूर्ण बंदी घालण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. ध्वनी प्रदूषण आणि पर्यावरणासंदर्भात आधीपासूनच स्पष्ट कायदे व नियम अस्तित्वात असताना त्यांचे उल्लंघन होत असल्याबाबत न्यायालयाने राज्य सरकारला प्रश्न विचारले.

## एक-दोन दिवसांत दुष्काळ जाहीर होणार: शिंदे



**मुंबई :** आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रामुख्याने दुष्काळ परिस्थितीवर चर्चा करण्यात आली. राज्याच्या बहुतांश भागात पिके करपली असून पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील प्राथमिक दुष्काळ जो आहे तो एक-दोन दिवसात जाहीर होणार असल्याची माहिती दिली आहे.

पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, ज्या भागांमध्ये दुष्काळ सदरसुह परिस्थिती आहे तिकडे देखील प्राथमिक दुष्काळ जाहीर करण्याची मागणी झाली आहे. यावर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे प्राथमिक दुष्काळ जो आहे तो एक-दोन दिवसात जाहीर होईल. तसेच उद्यापासून तालुका पातळीवर पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत आणि मुख्यमंत्री देखील काही भागांमध्ये जाणार आहेत. मी देखील दुष्काळग्रस्त भागात अमरावतीमध्ये जाणार आहे.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, कठीण प्रसंग शेतकऱ्यांवर आला आहे. उभी पिके करपून गेली आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना दिलासा देणे हे सरकारचे काम आहे. बळीराजा हा आम्हाला सगळ्यात महत्त्वाचा आहे. आम्ही नेहमी सांगतो की या सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क बळीराजाचा आहे. ज्यावेळेस अतिवृष्टी झाली, दुष्काळ पडला, त्यावेळेस सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी आहे. अनेकवेळा एनडीआरएफचे निकष आम्ही डावलून मदत केली होती. यावेळेस देखील मी आपल्या माध्यमातून शेतकऱ्यांना शब्द देऊ इच्छितो की शेतकऱ्यांची दसरा दिवाळी काळी होऊ देणार नाही. सरकार गंभीर आहे आणि आजच्या बैठकीत सर्व मंत्रीमहोदयांच्या सुचनांची दखल मुख्यमंत्र्यांनी घेतली असून याची अंमलबजावणी तातडीने सुरू होणार आहे.

जे जे नुकसान झाले आहे ते सगळे मोजले जाणार आहे आणि पंचनामे करून मदत पुरवली जाईल. केंद्र सरकारकडून देखील मदत मागितली जाणार आहे. आज मी शिवसेनेच्या मंत्र्यांची बैठक घेतली, त्यानं सूचना दिल्या की जिथे जिथे दुष्काळ आहे तिथे जाऊन पाहणी करावी. येणाऱ्या एक-दोन महिन्यात शेतकऱ्यांना दुष्काळाला सामोरे जावे लागले आहे याची तजवीज सरकारकडून केली जाणार आहे. या ठिकाणी मी हे देखील सांगू इच्छितो की ज्या शेतकऱ्यांच्या मुलींची लग्न आहेत त्यांची जबाबदारी शिवसेना घेईल. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही, असे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.

## आज तुम्ही रडवत आहात, नंतर आम्ही रडायला लावू

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आंदोलनाला कोणीच साथ द्यायची नाही का? जे आंदोलक सहकार्य करत आहेत, त्यांना तुरुंगात टाकण्याचा सपाटा या सरकारने लावला आहे. पण लक्षात ठेवा, तुमचे सरकार कायम राहणार नाही; ते कधीतरी बदलणारच आहे. शिंदेंनी त्यांचे स्वप्न पूर्ण केले मग आम्ही सुद्धा २०२९ मध्ये रडायला लावणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. मनोज जरांगे म्हणाले की, 'चौकशीच्या नावाखाली मराठा आंदोलकांना अडकवण्याचं काम चालू आहे. मला साथ देणारा किंवा सहकार्य करणारा असेल, तर त्याला जेलमध्ये टाकणार किंवा त्याच्या चौकशा करणार, असंच करणार ना? आता तुमच्या हातात सत्ता आहे. मंत्री, आमदार, खासदार आणि सर्व ताकद तुमच्याकडे आहे. मग मराठा आंदोलकांना मदत करणाऱ्यांवरच चौकशा का? इथं सिस्टिम कशी आहे बघा— ज्या उपमुख्यमंत्र्यांना, आमदारांना, खासदारांना आपण निवडून दिलं, ज्यांना मराठ्यांच्या मतांवर अधिकार मिळाला, त्यांनी मतदारांच्या आणि मराठा आंदोलकांच्या कामाला यायला पाहिजे. पण इथं सगळं उलट चाललंय.' मनोज जरांगे म्हणाले की, 'सत्ता कायम राहत नसते, ती एका न एका दिवशी बदलणारच आहे. आणि आम्हीसुद्धा लक्ष ठेवून आहोत. ज्यावेळेस सत्ता बदलेल, त्यावेळेस तुमच्यासुद्धा चौकशा जशास तशाच होणार, सुट्टी अजिबात देणार नाही. तुम्ही जितके खुनशी आहात, त्याच्या दुप्पट मी आहे! आम्ही न भोगलेले भोग भोगायला तयार आहोत आणि सगळे जण जेलमध्ये जायलासुद्धा तयार आहेत. मराठा आंदोलक जेलमध्ये जायचीच वाट बघतोय.'


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ सप्टेंबर २०२६


## ज्ञानोपासक महाविद्यालयात भारतीय मत्स्यखाद्य महोत्सव व कार्यशाळेला प्रतिसाद



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात मत्स्यशास्त्र विभागाच्या वतीने भारतीय मत्स्यखाद्य महोत्सव व मत्स्य ओळख तंत्रज्ञान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही उपक्रमांना विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील मत्स्यशास्त्र विभागात 'भारतीय मत्स्यखाद्य महोत्सव' व 'मत्स्य ओळख तंत्रज्ञान कार्यशाळा' या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. धनाजी पाटील व डॉ. संदीप मरकड (सेनगाव) हे उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. शाम गोरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. संतोष जाधव, नॅकचे समन्वयक प्रा. डॉ. दिनकर कोतवाल यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यशाळेत विविध जिवंत मत्स्य प्रजातींचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. मत्स्यशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. पाटील व डॉ. मरकड यांनी उपस्थितांना कटला, रोहू, मिरगल, झिंगा, खेकडा इत्यादी विविध मत्स्य प्रजातींची ओळख करून दिली. तसेंच त्यांचे वेगळेपण, वैशिष्ट्ये व वर्गीकरण याविषयी प्रात्यक्षिकाद्वारे मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी बहुसंख्य मत्स्य अभ्यासक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. तर 'मत्स्यखाद्य महोत्सव' मध्ये स्वतः विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या मत्स्य पाककृती तयार करून त्यांचे प्रदर्शन भरविले. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध मत्स्य पदार्थांचा उपस्थितांनी आस्वाद घेतला. या उपक्रमातून भारतीय खाद्यसंस्कृतीमध्ये मत्स्य पदार्थांचे महत्त्व तसेच मत्स्य उत्पादनाला मूल्यवर्धनाची जोड देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मत्स्यगंधा मंडळाचे अध्यक्ष आकाश देवकते तर आभारप्रदर्शन मत्स्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. निवृत्ती पोपतवार यांनी केले. या उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. रवी कावळे, प्रा. डॉ. भागवत ठाकरे, प्रा. शिरीषकुमार रुद्रवार, प्रा. डॉ. नयना रत्नपारखी, संशोधक विद्यार्थिनी पूजा तरटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## इकरा पब्लिक स्कूलची जिल्हा स्तरावर निवड; सलग तीन विजयांसह अंतिम सामन्यात रुस्तमजी इंटरनॅशनलचा पराभव




**जळगाव :** जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयार्फे आयोजित तालुकास्तरीय शालेय क्रिकेट (लेदर बॉल) स्पर्धेत इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या १७ वर्षांखालील संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. अनुभूती इंटरनॅशनल स्कूल (शिरसोली रोड) च्या मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत इकराच्या संघाने सलग तीन सामने जिंकून विजेतेपदावर आपले नाव कोरले असून आता या संघाची जिल्हा स्तरावर निवड झाली आहे.या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात इकरा पब्लिक स्कूलच्या संघाने अत्यंत चमकदार कामगिरी करत विवेकानंद प्रतिष्ठान इंग्लिश मिडीयम स्कूलचा पराभव करून विजयी घोडदौड सुरू केली. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात (उपांत्य फेरीत) विवेकानंद प्रतिष्ठान सेमी इंग्लिश संघाला पराभूत करत इकराच्या संघाने दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला.अत्यंत रोमांचक ठरलेल्या अंतिम सामन्यात इकरा पब्लिक स्कूलचा सामना रुस्तमजी इंटरनॅशनल स्कूलशी झाला. दोन्ही संघांमध्ये झालेली ही लढत अतिशय अटीतटीची ठरली आणि सामना बरोबरीत सुटल्याने विजेतेपदाचा निर्णय 'सुपर ओव्हर'मध्ये घेण्यात आला. सुपर ओव्हरमध्ये इकराच्या संघाने उत्कृष्ट खेळ करत रुस्तमजी इंटरनॅशनल संघाचा पराभव केला आणि अजिंक्यपद पटकावले.संघाचा कर्णधार वकास शेख वसीम याने आपल्या कुशल आणि अभ्यासू नेतृत्वाच्या जोरावर संघाला हा ऐतिहासिक विजय मिळवून दिला. इकरा पब्लिक स्कूलचे खेळाडू गेल्या अनेक महिन्यांपासून क्रिकेटचा कठोर सराव करत होते.याच सातत्यपूर्ण मेहनतीचे फळ म्हणून त्यांनी शहरातील नामांकित नॅशनल आणि इंटरनॅशनल शाळांच्या बलाढ्य संघांना मात देऊन हे यश संपादन केले.या यशामागे क्रीडा शिक्षक आमिर खान सर आणि वसीम खान सर यांचे मोलाचे मार्गदर्शन, नियोजन आणि कठोर परिश्रम कारणीभूत ठरले. या ऐतिहासिक विजयाबद्दल आणि जिल्हा स्तरावर निवड झाल्याबद्दल इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. करीम सालार, जनरल सेक्रेटरी एजाज मलिक, आणि प्रिंसिपल शेख शकील यांनी सर्व खेळाडू, कर्णधार आणि क्रीडा शिक्षकांचे विशेष कौतुक करून त्यांना पुढील जिल्हास्तरीय सामन्यांसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# विधान परिषदेच्या ५ जागांसाठी २३ ऑक्टोबरला मतदान

**मुंबई/बीड - भगवंत पाळवदे :** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेतील पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील पाच जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार औरंगाबाद विभाग पदवीधर, पुणे विभाग पदवीधर, नागपूर विभाग पदवीधर, अमरावती विभाग शिक्षक आणि पुणे विभाग शिक्षक या पाच मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येणार आहे.या निवडणुकीसाठी २९ सप्टेंबर २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, अर्जांची छाननी ७ ऑक्टोबर, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर २०२६ आहे. मतदान २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होईल. मतमोजणी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात येणार असून, निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण केली जाणार आहे.महाराष्ट्रातील या पाच जागांमध्ये औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून सतीश चव्हाण, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून अरुण लाड, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून अभिजीत वंजारी, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून किरण सरनाईक आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून जयंत आसगावकर या विद्यमान सदस्यांचा समावेश आहे.भारत निवडणूक आयोगाने या निवडणुकांची घोषणा केल्यापासून संबंधित मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता तत्काळ लागू झाली आहे. पदवीधर व शिक्षक मतदारसंघांसह विधान परिषद निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहितेच्या तरतुदी लागू करण्याबाबत आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांमध्येही स्पष्टता देण्यात आली असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ सप्टेंबर २०२६


## गणेश मंडळात शासकीय योजना व रोजगाराच्या संधींची जनजागृती




**मुंबई / बीड / (भगवंत पाळवदे) :** गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणाला लोकजागृतीची जोड देत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या ‘लोकसंवाद २०२६’ या उपक्रमातून मुंबई उपनगरातील गणेश मंडळांच्या माध्यमातून शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. सांताक्रूझ पूर्व आणि कलिना परिसरातील गणेश मंडळांमध्ये गणेशभक्त, रहिवासी, विद्यार्थी, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांशी थेट संवाद साधून विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.सांताक्रूझ (पूर्व) येथील सेंट मेरी स्कूलजवळील ‘सहयोग मित्र मंडळा’मध्ये अध्यक्ष अमर कुचिकुर्वी, खजिनदार संतोष अन्नारेड्डी आणि सचिव आदित्य अण्णारेड्डी यांच्या उपस्थितीत नागरिकांशी संवाद साधण्यात आला. शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र नागरिकांनी कसा घ्यावा, संबंधित विभागांकडून उपलब्ध सेवा कोणत्या आहेत आणि त्यासाठी आवश्यक प्रक्रिया याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.सांताक्रूझ (पूर्व) येथील संतोष हॉटेलजवळील ‘वाकोल्याचा मोरया’ – साई दृष्टी मित्र मंडळात अध्यक्ष विशाल पवार, खजिनदार प्रेम काटकर आणि सचिव वडीवेल पंढराम यांच्या उपस्थितीत लोकसंवादाचा उपक्रम राबविण्यात आला. गणेशोत्सवासाठी एकत्र आलेल्या नागरिकांपर्यंत शासनाच्या योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी या संवादाचा उपयोग करण्यात आला.कालिना विद्यापीठासमोरील माणिपाडा परिसरातही ‘लोकसंवाद २०२६’ला चांगला प्रतिसाद मिळाला. ‘कालिना, माणिपाडाचा महाराजा’ – माणिपाडा रहिवासी सेवा संघ येथे अध्यक्ष विजय तांद्रा, खजिनदार समित कोटियन आणि सचिव केव्हिन कुराय्या यांच्या उपस्थितीत नागरिकांशी संवाद साधण्यात आला.त्याच परिसरातील ‘माणिपाडाचा राजा’ – माणिपाडा सार्वजनिक मित्र मंडळात अध्यक्ष अनिल जाधव, खजिनदार संजय पवार आणि सचिव निशांत सालियन यांच्या उपस्थितीत शासकीय सेवा व योजनांची माहिती देण्यात आली.‘विद्यानगरीचा विघ्नहर्ता’ – विद्यानगरी युथ ग्रुप, माणिपाडा येथे अध्यक्ष रोहित साहू, खजिनदार विकास साहू आणि सचिव राजू साहू यांच्या उपस्थितीत युवक व नागरिकांशी संवाद साधण्यात आला. विशेषतः युवकांना कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी आणि शासनाच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.गणेश मंडप बनले माहितीचे व्यासपीठ गणेशोत्सवात परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने गणेश मंडळांना भेट देत असल्याने गणेश मंडपांचे रूपांतर लोककल्याणकारी योजनांच्या माहितीच्या व्यासपीठात करण्याचा अभिनव प्रयत्न ‘लोकसंवाद २०२६’च्या माध्यमातून करण्यात येत आहे. नागरिकांना केवळ योजनांची माहिती देण्याबरोबरच पात्रता, अर्जाची प्रक्रिया, संबंधित शासकीय कार्यालय आणि उपलब्ध सुविधांबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले.युवक, विद्यार्थी, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय सेवा-सुविधांची माहितीही देण्यात आली. रोजगाराच्या शोधात असलेल्या युवकांना कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकतेशी संबंधित संधींची माहिती देत उपलब्ध संधींचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सहकार्य‘लोकसंवाद २०२६’ उपक्रमासाठी माहिती व जनसंपर्क विभागासोबत समाजकल्याण, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने सहभाग घेतला. विभागीय संपर्क अधिकारी ब्रिजकिशोर झंवर आणि संजय ओरके यांनी विविध गणेश मंडळांना भेटी देत लोकसंवाद उपक्रमाचे समन्वयन केले. यावेळी ग्राम महसूल अधिकारी घोषिता गोसावी, समाजकल्याण कार्यालयाच्या अतिरिक्त प्रकल्प अधिकारी नंदना गजभिये, तालुका समन्वयक आनंदा कांबळे, समतादूत सिद्धार्थ शिरसाट तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे जिल्हा समन्वयक परेश अपंडकर यांनी नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधला. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार आणि जिल्हा नियोजन अधिकारी प्रशांत भामरे यांच्या सहकार्यामुळे ही लोकसंवाद मोहीम मुंबई उपनगरात यशस्वीपणे राबविण्यात आली.गणेशोत्सवाच्या माध्यमातून उत्सव, जनजागृती आणि शासकीय योजनांची माहिती यांचा संगम साधत ‘लोकसंवाद २०२६’ उपक्रम मुंबई उपनगरातील विविध भागात नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक यांच्या सहकार्यामुळे शासनाच्या योजना आणि सेवा अधिक व्यापकपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यास मदत होत आहे.

## शिक्षणासाठी डिग्री की डिग्रीसाठी शिक्षण?

महाविद्यालयाच्या वर्गांमध्ये शिक्षक उभे आहेत, फळा आहे, शिकवण्याची तयारी आहे, प्रश्नांची उत्तरे देण्याची तयारी आहे... पण समोर बाकांवर विद्यार्थी नाहीत. शिक्षक वाट पाहत राहतात, "लेक्चरला या" म्हणून फोन करावा, "परीक्षा आली की उद्या पेपर आहे, कॉलेजला या", उद्या अमुक-अमुक विषयाचा पेपर आहे हेही सांगायची वेळ यावी, ही केवळ एका वर्गाची गोष्ट नाही, तर ही आजच्या महाविद्यालयीन शिक्षणासमोर उभी राहिलेली एक अस्वस्थ करणारी वस्तुस्थिती आहे.महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षकांनी "कशासाठी प्रवेश घ्यायचा आहे?" हा साधासुधा केलेला प्रश्न विचारला, तरी त्याचे उत्तरही अनेकदा विद्यार्थ्यांकडे नसतं. कुणी म्हणतं, "घरच्यांनी सांगितलं म्हणून", आणि कुणाचं उत्तर तर अगदी सरळ असतं, फक्त डिग्री/पदवी हवी म्हणून!! एवढेच ध्येय असेल, तर प्रश्न विद्यार्थ्यांच्या इच्छेचा जितका आहे, तितकाच तो आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या अर्थाचाही आहे. कारण पदवी ही शिक्षणाचा शेवटचा पुरावा असू शकतो; पण ती शिक्षणाचा उद्देश कधीच असू नये.आज अनेक महाविद्यालयांमध्ये अशी परिस्थिती दिसते की प्रवेश घेतला जातो, पण वर्गात उपस्थित राहणं टाळलं जातं. अभ्यासासाठी पुस्तक उघडण्यापेक्षा परीक्षेच्या वेळी काहीतरी करून पास होण्याची धडपड अधिक दिसते. विद्यार्थ्यांना परीक्षेची तारीख लक्षात नसते, उद्या कोणत्या विषयाचा पेपर आहे हे माहीत नसतं आणि शिक्षकांना वारंवार फोन करून सांगावं लागतं - "उद्या पेपर आहे, प्रॅक्टिकल आहे, कॉलेजला या"!! हा प्रसंग वर पाहता साधा वाटू शकतो; पण त्यामागे मोठा प्रश्न आहे. ज्या विद्यार्थ्यांना स्वतःच्या परीक्षेची चिंता नाही, त्यांना भविष्याची जाणीव तरी असेल का?पण यासाठी सर्व दोष विद्यार्थ्यांचाच आहे असं म्हणणंही चुकीचं ठरेल, कारण विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाबद्दलची उदासीनता एका दिवसात निर्माण होत नाही. आपणच अनेकदा शिक्षणाची किंमत गुणांमध्ये मोजली, आपणच पदवीला नोकरीचे तिकीट बनवलं, आपणच काही अभ्यासक्रमांना प्रतिष्ठेची आणि काहींना कमीपणाची लेबलं लावली.विशेषतः कला शाखेकडे पाहण्याची आपली मानसिकता याचे उदाहरण आहे.

"बी.ए. म्हणजे एक साधी डिग्री आहे, त्यासाठी कॉलेजला रोज जाण्याची काय गरज?" हा प्रश्न केवळ एका अभ्यासक्रमाचा अपमान करत नाही, तर तो आपल्या शिक्षणाच्या संकल्पनेलाच छोटं करतो. कारण शिक्षणाचं खरं मूल्य आपण कोणत्या शाखेत आहोत यावर ठरत नाही, तर त्या शिक्षणातून आपण किती विचार करायला, प्रश्न विचारायला शिकलो यावर ठरतं. मग बी.ए. ही "थर्ड क्लास डिग्री" कशी? खरंतर कोणतीही पदवी माणसाला मोठा करत नाही; त्या पदवीच्या निमित्ताने मिळालेली विचारांची दृष्टी माणसाला मोठं करते.शेवटी महाविद्यालयातून बाहेर पडताना हातात पदवी असणं ही नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे! पण त्या पदवीसोबत आपण काय मिळवलं, हा प्रश्न त्याहून जास्त महत्त्वाचा आहे. चार वर्षे कॉलेजमध्ये घालवून जर आपल्याला स्वतःच्या विषयाबद्दल, समाजाबद्दल, आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींबद्दल विचार करायला शिकता आलं नाही, तर त्या शिक्षणाचा काय अर्थ?शिक्षण म्हणजे फक्त परीक्षेत उत्तीर्ण होणे नाही. शिक्षण म्हणजे चुकीचं दिसलं तर प्रश्न विचारण्याची हिंमत, योग्य-अयोग्य ओळखण्याची समज, दुसऱ्याचं म्हणणं ऐकण्याची तयारी आणि स्वतःच्या विचारांकडेही प्रश्नार्थक नजरेने पाहण्याची क्षमता. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःला प्रश्न विचारायला हवा - मी कॉलेजला फक्त उपस्थित असतो, की खरंच काहीतरी नवीन शिकतो?उद्या पदवी हातात असेल, नावापुढे फक्त पदवीधर लिहिलेलं असेल; पण त्या पदवीने जर माझ्या विचारांना दिशा दिली नाही, समाजाकडे पाहण्याची दृष्टी दिली नाही, तर त्या सोन्यासारख्या कागदाची किंमत आपल्या आयुष्यात शून्य ठरेल. पदवी मिळाली म्हणून शिक्षण पूर्ण झाले असे होत नाही. पण आजची स्थिती पाहता एकच प्रश्न मनात येतो की- "शिक्षणासाठी डिग्री की डिग्रीसाठी शिक्षण?“




**कु- पुजा प्रमोद चव्हाणशिवाजी महाविद्यालय कन्नड (बी.ए. द्वितीय वर्ष)**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ सप्टेंबर २०२६

## मुरूम येथे 'श्री गणेश व्याख्यानमाले' त योग व आरोग्यावर मार्गदर्शन



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, मुरूम येथे श्री गणेश उत्सवानिमित्त 'श्री गणेश व्याख्यानमाला' आयोजित करण्यात आली आहे. या व्याख्यानमालेच्या दुसऱ्या पुष्पात डॉ. सुवर्णा शितलकुमार पाटील यांनी 'योग व आरोग्य' या विषयावर मार्गदर्शन केले.यावेळी डॉ. पाटील यांनी योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व स्पष्ट केले. नियमित योगाभ्यासामुळे शरीर तंदुरुस्त राहण्यासोबतच मनावरील ताण कमी होऊन सकारात्मक जीवनशैली विकसित होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात योग, व्यायाम आणि संतुलित आहाराचा अंगीकार करावा, असे आवाहनही त्यांनी केले.कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले, प्रा. माने के. बी., प्रा. राठोड एस. बी. तसेच इतर प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यानमालेमुळे विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक उपयुक्त माहिती मिळाली.

## महिला कमर्शियल पायलट घडविण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा पुढाकार

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** "मुलींनी केवळ मोठी स्वप्ने पाहू नयेत, तर ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी त्यांना योग्य संधी आणि व्यासपीठही मिळाले पाहिजे" या दृष्टिकोनातून जालना जिल्ह्यातील होतकरू मुलींसाठी विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरची नवी दारे खुली करण्याचा पुढाकार जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल (भा.प्र.से.) यांनी घेतला आहे. श्रीमती आशमा मित्तल या सध्या जालना जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने IndiGoReach यांच्या "Giving Wings to Fly – Shaping the Future of Indian Women in Aviation" या उपक्रमाअंतर्गत जालन्यातील पात्र युवतींना Commercial Pilot म्हणून करिअर घडविण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.दि.२४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील DPC Hall येथे हा कार्यक्रम होणार आहे. १८ ते ३५ वयोगटातील भारतीय महिला उमेदवारांसाठी ही संधी असून, १०+२ मध्ये इंग्रजी, भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांत प्रत्येकी किमान ५१ टक्के गुण तसेच लागू EWS उत्पन्न निकष आवश्यक आहेत. निवड झालेल्या पात्र उमेदवारांना Commercial Pilot Licence (CPL) आणि ATR Type Rating Training, प्रशिक्षणादरम्यान निवास व भोजनासाठी १०० टक्के सहाय्य, वैद्यकीय विमा तसेच पायलट मेंटॉरशिप आणि करिअर मार्गदर्शनाचा समावेश असल्याचे कार्यक्रमाच्या माहितीत नमूद आहे.या उपक्रमामागील व्यापक उद्देश म्हणजे जालना जिल्ह्यातील मुलींना पारंपरिक करिअरच्या पलीकडे पाहण्याची प्रेरणा देणे आणि विमान वाहतूक क्षेत्रासारख्या आव्हानात्मक क्षेत्रात त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी संधीची दारे खुली करणे."आपल्या मुलींनी विमानात केवळ प्रवासी म्हणूनच नव्हे, तर त्या विमानाच्या कॉकपिटमध्ये पायलट म्हणूनही बसावे. आर्थिक किंवा सामाजिक परिस्थिती त्यांच्या स्वप्नांच्या आड येऊ नये. जालन्यातील मुलींनी आत्मविश्वासाने आकाशाला गवसणी घालावी, हीच या उपक्रमामागची भावना आहे."असे जालना जिल्हाचे जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी सांगितले.'बेटी बचाओ, बेटी पढाओ'पासून आता 'बेटी को पायलट बनाओ'कडे एक नवे पाऊल — जालन्याच्या मुलींच्या स्वप्नांना आता खऱ्या अर्थाने पंख मिळणार आहेत!'जालन्याची लेक… आता आकाश तिचे! ' ही गौरवास्पद बाब असल्याचे जे ई एस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले.

## श्री गणेश महासंघच्या वतीने आयोजित कार्यक्रमात भाविकांची गर्दी




**कन्नड (अरुण थोरात) :** श्री गणेश महासंघ, कन्नड यांच्या वतीने आयोजित भव्य कीर्तनाचा कार्यक्रम दि.21 सप्टेंबर रोजी रात्री 09 वाजता उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. रामेश्वर महाराज नावडीकर यांनी गणपती बाप्पांच्या महिम्यावर प्रभावी कीर्तन सादर करत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. गणपती बाप्पांचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व, गणेशभक्ती, संस्कार आणि समाजात एकोपा निर्माण करण्यासाठी धार्मिक परंपरांचे महत्त्व यावर महाराजांनी आपल्या कीर्तनातून मार्गदर्शन केले. किर्तना दरम्यान गणपती बाप्पांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सदाशिव पाटील, माजी उपनगराध्यक्ष, कन्नड आणि सुनील अण्णा निकम यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी महासंघा चे अध्यक्ष सत्यम राठोड, राजेंद्र गव्हने, याकुब भाई, अनिल खंबाट, गणेश पंडित, नाना वाळुंजे, रमेश नागरे यांच्यासह अनेक मान्यवर व गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री गणेश महासंघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कीर्तनाचा लाभ घेतला.

## फतुलाबाद शिवारातून सोलर वॉटर पंप अन् केबलची चोरी, अज्ञात चोरट्याविरुद्ध दौलताबाद पोलिसांत गुन्हा दाखल

**दौलताबाद (जावेद अहमद) :** दौलताबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फतुलाबाद शिवारात शेतातील विहिरीवरून सोलर वॉटर पंप मोटार आणि केबल अज्ञात चोरट्यांनी लांबवल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी दौलताबाद पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, खोजेवाडी (ता. गंगापूर) येथील रहिवासी शेतकरी गोवर्धन सोमीनाथ शिंदे (वय ३५) यांची फतुलाबाद शिवारातील गट क्रमांक १८ व १६ मध्ये २ एकर शेती आहे. त्यांनी शेतात सिंचनासाठी 'सीआरआय' (CRI) कंपनीची ३ एचपी (3 HP) क्षमतेची सोलर वॉटर पंप मोटार आणि १५० फूट केबल बसवली होती दि १३ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८:०० वाजेच्या सुमारास शेतातील काम आटोपून शिंदे घरी निघून गेले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी, १४ सप्टेंबर रोजी सकाळी १०:०० वाजेच्या सुमारास ते शेतात आले असता विहिरीवर बसवलेली मोटार आणि केबल गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. आसपासच्या शेजाऱ्यांकडे विचारणा करून व शोध घेऊनही मोटार आढळून आली नाही अज्ञात चोरट्याने १३ सप्टेंबरच्या रात्री ८:०० ते १४ सप्टेंबरच्या सकाळी १०:०० वाजेच्या दरम्यान संधी साधून ही चोरी केल्याची खात्री पटल्यानंतर, गोवर्धन शिंदे यांनी १८ सप्टेंबर २०२६ रोजी दौलताबाद पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार खुशाल पाटील हे करत आहेत.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ सप्टेंबर २०२६


## वास्तवता

अफाट शहरे
उंच गगनचुंबी इमारती.
पाषाण हरदय,विषमता.
मंद झाली गती.
पाणी महाग ,
गावागावात दारू स्वस्त.
डॉक्टर जास्त,औषधी तुटवडा.
निरोगी कमी, रोगीच जास्त.
पाऊस कमी, सोयाबीन पंगू.
वृक्षवल्लीच्या फुलात
ना ,रज अन् पराग.
गरीबी हटाव नारा,
खेड्यात नाहीत चिराग.
राजकारणी बेफाम
अधिकाऱ्याशी साटलोट .
ईव्हीएम मतदान, नोटांनी
पामरचे लुटती वोट.
मोटार ताफा,सिक्युरिटी
मोठा त्यांचा पसारा.
सुशिक्षित बेजार,
मुले रस्त्यावर,
वृध्दांना नाआसरा.
माहितीचे अधिकार
सर्वत्र तज्ञही वाढले.
न्यायव्यवस्था,पेपर फुटीचे
घोटाळे,दहशत , धाडी,
राजकारण्यांचे धाबे दणाणले.
गब्बर जाहले उद्योजक,
त्यांचे उत्पन्न वाढले.
जागतिकीकरण फास
खोटा प्रगतीचा ध्यास.
कामगाराचे पंख छाटले.
विकाऊ नेते,भाषणे सोपे
यांनीच उध्वस्त केले
चिमणी पाखरांचे खोपे.
आदर्शहीन नेतृत्व,शेतकरी बेजार.
महागाई,फी,पेट्रोल,घोडेबाजार.
कुंभमेळा, चंदाचोरी शिरजोरी
माणुसकीचा देखावा.
सौजन्याची ऐशी तैशी
भक्त वरचढ,सज्जन तोंडघशी.
घरातच दूजाभाव,दुफळी
हवीय ,जागतिक शांतता.
अनुकरण शून्य,नाही पात्रता.
अन्नधान्याचा सुकाळ
सांगतात गोदामे भरलेली.
कुपोषित बालके,
कळी गर्भात कोमेजली.
तरुणाईत कावड, चरस
गांजा रसद पुरविता
.धार्मिकता पसरवून
अन्नात भेसळ,ना सकसता.
प्राणी,जल,जंगल
जमिनीचा ऱ्हास.
दिसत नाहीत मोर,
ई व्हीं एमने, माजले चोर.
पक्षीय राजकारण
,गुणवान कमी,
खोगीर भरती
जिथे तिथे आज
खोट्याची आरती.
भारत देश माझा
शौर्याचा वसा
वारसा जपा,मार्गक्रमनं करा
अन्यथा ऱ्हास चाहूल.
चुकीचे पडत आहे,पाऊल.
भविष्याचे वेध घेत
वाटचाल करा.अन्
वास्तवता करा कबूल.
वास्तवता...
वास्तवता...
वास्तवता...

**(मधुबानंदा प्रधान. अकोला.)**

# मराठवाडा मुक्तिदिनानिमित्त कला महाविद्यालय, बिडकीन येथे विशेष कार्यक्रम




**बिडकीन :** एकता शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला महाविद्यालय, बिडकीन येथे इतिहास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्तिदिनाचे औचित्य साधून 18 सप्टेंबर 2026 रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील तसेच मराठवाड्याच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक इतिहासातील महत्त्वपूर्ण अशा मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन आहेर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सय्यद मुजीब उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक म्हणून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. मेश गायकवाड तसेच प्रा. मिलिंद ठोकळे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. सय्यद मुजीब यांनी हैदराबाद संस्थानाच्या मुक्तिसंग्रामाचा सविस्तर ऐतिहासिक आढावा घेतला. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाल्यानंतरही हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले नव्हते. निजामाच्या राजवटीखालील जनतेने स्वातंत्र्य, लोकशाही आणि भारतीय संघराज्यातील विलिनीकरणासाठी केलेल्या संघर्षाचे त्यांनी विविध अंगांनी विश्लेषण केले.मराठवाड्यातील स्वातंत्र्यसैनिक, सामान्य नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि विविध सामाजिक घटकांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामात दिलेल्या योगदानावर त्यांनी प्रकाश टाकला. 17 सप्टेंबर 1948 हा दिवस मराठवाड्यासह हैदराबाद संस्थानातील जनतेसाठी ऐतिहासिक परिवर्तनाचा दिवस ठरला, असे स्पष्ट करताना या संघर्षामागील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.हैदराबाद मुक्तिसंग्राम हा केवळ राजकीय सत्तांतराचा इतिहास नसून तो लोकशाही मूल्ये, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, राष्ट्रीय एकात्मता आणि नागरिकांच्या हक्कांसाठी झालेल्या संघर्षाचा इतिहास आहे, असे त्यांनी सांगितले. इतिहासाचा अभ्यास करताना केवळ घटना आणि तारखा लक्षात न ठेवता, त्या घटनांमागील सामाजिक परिस्थिती, सामान्य जनतेचा सहभाग आणि त्यातून निर्माण झालेली मूल्यव्यवस्था समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश गायकवाड यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. इतिहासातील प्रेरणादायी घटनांमधून विद्यार्थ्यांनी वर्तमान समाजाच्या विकासासाठी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करावा, असे आवाहन त्यांनी केले.प्रा. मिलिंद ठोकळे यांनीही हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांनी स्थानिक इतिहासाचा अभ्यास करण्याची गरज व्यक्त केली. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. नितीन आहेर यांनी महाविद्यालयात इतिहास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना हैदराबाद मुक्तिसंग्रामातील विविध घटना, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामातील भूमिका यांविषयी माहिती देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्थानिक इतिहास आणि राष्ट्रीय इतिहास यांचा परस्परसंबंध समजून घेण्याची संधी मिळाली.कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संभाजी नगर केंद्रीय विद्यालयाचे केनगाव - एक अनुभवाधारित प्रतीकात्मक शिक्षणग्राम





**छत्रपती संभाजीनगर :** केंद्र सरकारच्या अनुभवाधारित व कौशल्याधारित शिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार, शिक्षण मंत्रालयाने विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता, त्यांना प्रत्यक्ष कृती व अनुभवातून शिकण्याच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला आहे. याच शैक्षणिक संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत छत्रपती संभाजीनगर येथील पीएम श्री केंद्रीय विद्यालयात 'केनगाव – अनुभवाधारित प्रतीकात्मक शिक्षणग्राम' हा अभिनव उपक्रम साकारण्यात आला आहे. विद्यालयाचे प्राचार्य अनिल यादव यांच्या मार्गदर्शनाखाली, प्राथमिक शिक्षक कृष्णा मोरे यांच्या संकल्पनेतून व सातत्यपूर्ण प्रयत्नांतून आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून हे प्रतीकात्मक शिक्षणग्राम आकाराला आले आहे. 'केंद्रीय ' या इंग्रजी शब्दातील पहिली तीन अक्षरे घेऊन त्याला 'गाव' जोडून 'केनगाव' हे नाव तयार झाले आहे.वर्ष 2022 मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमामागे पुस्तकातील ज्ञानाला प्रत्यक्ष जीवनानुभवाची जोड देऊन विद्यार्थ्यांचे शिकणे सहज, आनंददायी व अर्थपूर्ण करणे, ही संकल्पना आहे.पुस्तकातील 'झोपडी' प्रत्यक्ष अनुभवातशहरी भागातील मुलांसाठी पुस्तकातील 'झोपडी' केनगावमध्ये प्रत्यक्ष अनुभव बनते. विद्यार्थी झोपडी पाहतात, तिच्यात बसतात आणि स्वतःच्या हातांनी ती उभारण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतात. झोपडीत चुलीवर भाजी शिजताना पाहून व स्वयंपाकात सहभागी होऊन ते अन्न, पोषण, पारंपरिक स्वयंपाकपद्धती आणि खाद्यसंस्कृती जाणून घेतात.जातं, पाटा-वरवंटा अन् रांजणांची उतरंड:दगडी जात्यावर धान्य दळताना विद्यार्थ्यांना ज्वारी, बाजरी, गहू, मका यांची ओळख होते आणि धान्यापासून पीठ तयार होण्याची प्रक्रिया समजते. पाटा-वरवंट्यावर मसाले वाटताना विविध मसाल्यांची ओळख होते. रांजणांची उतरंड पाहून पूर्वी पाणी व अन्नपदार्थ साठविण्याच्या पद्धतीसह पर्यावरणपूरक जीवनशैलीची ओळख होते.किचन गार्डनमधील बाजरी-ज्वारीचे दाणे पक्ष्यांना खाताना पाहून विद्यार्थी पक्षिजगताशी जोडले जातात. कवितेत वाचलेले 'बुजगावणे' प्रत्यक्ष पाहताना त्यांचे कुतूहल जागृत होते आणि पिकांच्या संरक्षणाची पारंपरिक पद्धत समजते.शंभरहून अधिक शिक्षणसाधने :केनगाव शिक्षणग्राममध्ये झोपडी, चूल, जातं, पाटा-वरवंटा, रांजणांची उतरंड, प्रतीकात्मक विहीर व पवनचक्की, वाऱ्याची दिशा दर्शविणारे यंत्र, बैलाची प्रतिकृती, पक्ष्यांची घरटी, क्यू आर कोडयुक्त औषधी वनस्पती, 75 वृक्षांचे अमृत उद्यान, किचन गार्डन, गांडूळखत प्रकल्प, कमळाचे तळे, गप्पी माशांचे संवर्धन आणि केळीची बाग यांसह शंभरहून अधिक अनुभवाधारित शिक्षणसाधने आहेत. ही केवळ प्रदर्शनाची साधने नसून प्रत्येक वस्तू, झाड, पीक आणि कृती विद्यार्थ्यांसाठी जिवंत पाठ्यपुस्तक बनली आहे.बी पेरण्यापासून तंत्रज्ञानापर्यंतविद्यार्थी स्वतः बी पेरतात, रोपांची निगा राखतात, प्रतीकात्मक विहिरीतून पाणी काढण्याचा अनुभव घेतात, पिकांची कापणी करतात आणि स्वतः पिकविलेल्या पिकांचा आस्वाद घेतात. यातून श्रमप्रतिष्ठा, अन्नाविषयी कृतज्ञता आणि निसर्गाशी नाते रुजते.औषधी वनस्पतींवरील क्यूआर कोड स्कॅन करून विद्यार्थी त्यांची माहिती जाणून घेतात. प्रतीकात्मक पवनचक्कीतून पवनऊर्जा व अक्षय ऊर्जेचे महत्त्व समजते, तर वाऱ्याची दिशा दर्शविणाऱ्या यंत्रातून वाऱ्याची दिशा ओळखता येते. गांडूळखत प्रकल्पातून सेंद्रिय खतनिर्मितीची प्रक्रिया समजते, तर कमळाच्या तळ्यातून जलजीवनाचे निरीक्षण करता येते.एका बाजूला झोपडी, चूल, जातं आणि रांजणांची उतरंड; तर दुसऱ्या बाजूला क्यूआर कोड आणि आधुनिक तंत्रज्ञान—परंपरा आणि आधुनिकतेचा हा सुंदर संगम 'केनगाव' शिक्षणग्रामची खास ओळख आहे. भारतीय ग्रामीण संस्कृती, पर्यावरण, विज्ञान, शेती आणि तंत्रज्ञानाला अनुभवाधारित शिक्षणाशी जोडणारे 'केनगाव' आज विद्यार्थ्यांसाठी जिवंत, आनंददायी आणि अनुभवसमृद्ध वर्गखोली बनले आहे.नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील अनुभवाधारित व कृतीप्रधान शिक्षणाची संकल्पना 'केनगाव 'मध्ये प्रत्यक्ष साकारली आहे. येथे विद्यार्थी पाहतात, अनुभवतात आणि स्वतः कृती करून आनंदाने शिकतात.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ सप्टेंबर २०२६

# पाण्यावर जगणारा समाज : पारंपरिक मच्छीमारांच्या अस्तित्वाचा आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न

एखाद्या समाजाची ओळख केवळ त्याच्या व्यवसायावरून होत नाही; त्या व्यवसायाशी जोडलेली त्याची संस्कृती, जीवनपद्धती, ज्ञानपरंपरा, सामाजिक संबंध आणि अस्तित्वाची जाणीव यांचा एकत्रित विचार केला तरच त्या समाजाचे वास्तव समजते. महाराष्ट्रातील पारंपरिक मच्छीमार समाजाकडे पाहताना हीच व्यापक दृष्टी आवश्यक आहे. मासेमारी हा या समाजासाठी केवळ उदरनिर्वाहाचा व्यवसाय नाही. नदी, तलाव, धरण आणि समुद्र हे त्याच्या जीवनविश्वाचा अविभाज्य भाग आहेत. पाण्याचा प्रवाह, ऋतूंचे बदल, माशांच्या प्रजाती, त्यांचे प्रजनन, जलाशयातील परिस्थिती, हवामान आणि बाजारपेठ यांचा अनुभव पिढ्यान्पिढ्या हस्तांतरित होत आला आहे. त्यामुळे मच्छीमाराकडे केवळ श्रम करणारा कामगार म्हणून न पाहता, जलपरिसंस्थेचे स्थानिक ज्ञान जपणारा एक महत्त्वाचा सामाजिक घटक म्हणून पाहणे गरजेचे आहे.मात्र आज या पारंपरिक जीवनपद्धतीसमोर अनेक प्रश्न उभे आहेत. आणि हे प्रश्न स्वतंत्र-स्वतंत्र नसून एकमेकांशी जोडलेले आहेत. जलस्रोतांमध्ये होणारे बदल, मत्स्यसंपत्तीतील घट, प्रदूषण, हवामानातील अनिश्चितता, मासेमारीच्या क्षेत्रावरील मर्यादा, वाढता खर्च, बाजारपेठेतील अस्थिरता, ठेका पद्धती, प्रशासकीय प्रक्रिया आणि विकासाच्या नावाखाली येणारे विविध प्रकल्प या सर्वांचा एकत्रित परिणाम मच्छीमारांच्या जीवनावर होत आहे. प्रश्न केवळ मासेमारीचा नाही; तो अस्तित्वाचा आहे. मच्छीमारांच्या प्रश्नाकडे आपण केवळ "मासे पकडण्याचा व्यवसाय" या मर्यादित चौकटीत पाहिले, तर या समस्येचे गांभीर्य आपल्या लक्षात येणार नाही.ज्या कुटुंबाची अनेक पिढ्यांची उपजीविका एखाद्या नदीशी किंवा जलाशयाशी जोडलेली आहे, त्याच्यासाठी त्या जलाशयातील बदल म्हणजे रोजगारातील बदल असतो. रोजगारातील बदल म्हणजे उत्पन्नातील अनिश्चितता; आणि उत्पन्नातील अनिश्चितता म्हणजे शिक्षण, आरोग्य, घर, कर्ज, विवाह आणि पुढील पिढीच्या भवितव्याशी संबंधित असुरक्षितता. म्हणूनच मच्छीमारांचा प्रश्न आर्थिक प्रश्नापासून सामाजिक प्रश्नाकडे आणि सामाजिक प्रश्नापासून मानवी प्रतिष्ठेच्या प्रश्नाकडे जातो. धरणांची निर्मिती, नदीच्या प्रवाहातील बदल, पाण्याच्या पातळीतील चढ-उतार, गाळ साचणे, जलप्रदूषण, जलवनस्पतींची वाढ आणि जलपरिसंस्थेतील बदल यांचा थेट परिणाम मत्स्यसंपत्तीवर होतो.मच्छीमारासाठी पाण्याची पातळी ही केवळ जलसाठ्याची आकडेवारी नसते. ती त्याच्या रोजच्या उत्पन्नाशी संबंधित असते. जलाशयातील पर्यावरणीय बदलांचा अभ्यास करताना त्यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न विचारावा लागतो— जलसंपत्तीचा विकास होत असताना त्या जलसंपत्तीवर जगणाऱ्या समाजाचे काय होते? हा प्रश्न विचारल्याशिवाय जलव्यवस्थापन पूर्ण होऊ शकत नाही. प्रदूषणाची किंमत कोण मोजणार?जलप्रदूषणाचा परिणाम सर्वांवर होतो; परंतु त्याची आर्थिक किंमत सर्वांना समान प्रमाणात मोजावी लागत नाही.पाणी प्रदूषित झाले, मत्स्यसंपत्ती कमी झाली किंवा माशांच्या प्रजननावर परिणाम झाला तर मच्छीमाराच्या हातातील उत्पन्नाचे साधकेंद्राच्या मदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांना मदत करणार, मंत्र्यासह, विविध यंत्रणा बांधावर जाणारन कमी होते. त्याच्याकडे पर्यायी भांडवल, मोठी उद्योगव्यवस्था किंवा दुसरी सुरक्षित रोजगारव्यवस्था असेलच असे नाही. येथे पर्यावरणीय नैतिकतेचा प्रश्न निर्माण होतो.नैसर्गिक संसाधनांचा वापर करण्याचा अधिकार ज्यांचा आहे, त्याचबरोबर त्या संसाधनांच्या ऱ्हासाची जबाबदारीही समाजाने स्वीकारली पाहिजे. निसर्गाचा वापर हा विकासाचा भाग असू शकतो; पण निसर्गाचा ऱ्हास हा विकासाची अपरिहार्य किंमत मानता येणार नाही. मच्छीमार समाजासमोरील आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जलाशयातील मासेमारी व्यवस्थापन. प्रशासनाच्या दृष्टीने ठेका, निविदा किंवा ई-टेंडर या व्यवस्थापनाच्या पद्धती असू शकतात. परंतु प्रशासनिक कार्यक्षमता आणि सामाजिक न्याय या दोन गोष्टी नेहमी एकच असतील असे नाही.ज्या व्यक्ती किंवा समाजाने पिढ्यान्पिढ्या त्या जलस्रोतावर आपली उपजीविका उभी केली आहे, त्याच्या पारंपरिक हक्कांचा आणि आर्थिक हिताचा विचार न करता केवळ आर्थिक व्यवहाराच्या निकषावर निर्णय घेतला तर प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच कोणत्याही जलाशयाच्या मासेमारी व्यवस्थापनात पारदर्शकता, स्थानिक सहभाग, सामाजिक परिणामांचा विचार आणि पारंपरिक मच्छीमारांच्या हिताचे संरक्षण ही मूलभूत तत्त्वे असली पाहिजेत. 'विकास' या संकल्पनेची फेरचिकित्सा आवश्यक आहे. आज विकास म्हणजे मोठे प्रकल्प, मोठी गुंतवणूक, ऊर्जा निर्मिती, पायाभूत सुविधा आणि आर्थिक वाढ, अशी सर्वसाधारण धारणा तयार झाली आहे. परंतु तत्त्वज्ञान आपल्याला एक मूलभूत प्रश्न विचारायला शिकवते— विकासाचा अंतिम उद्देश काय? जर एखादा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत असेल, परंतु त्याच्या परिणामामुळे एखाद्या समुदायाची पारंपरिक उपजीविका, सामाजिक सुरक्षितता किंवा पर्यावरणीय संतुलन धोक्यात येत असेल, तर त्या विकासाचे मूल्यांकन केवळ आर्थिक निकषांवर करता येईल का? खरा विकास हा केवळ GDP, गुंतवणूक किंवा उत्पादनवाढीत मोजला जाऊ नये. मानवी प्रतिष्ठा, सामाजिक न्याय, पर्यावरणीय संतुलन आणि भविष्यातील पिढ्यांचे हित यांचाही विकासाच्या संकल्पनेत समावेश असला पाहिजे.निर्णयप्रक्रियेत मच्छीमारांचा आवाज कुठे आहे? जलस्रोतांशी संबंधित निर्णय घेताना तांत्रिक आणि प्रशासकीय तज्ज्ञांची भूमिका निश्चितच महत्त्वाची आहे. परंतु स्थानिक मच्छीमारांचे अनुभवजन्य ज्ञानही तितकेच महत्त्वाचे आहे. कोणत्या काळात कोणती मासळी उपलब्ध होते, कोणत्या भागात प्रजनन होते, पाण्याच्या बदलत्या परिस्थितीचा मत्स्यसंपत्तीवर काय परिणाम होतो, कोणत्या पद्धतीमुळे जलसंपत्तीचे नुकसान होते—या प्रश्नांची उत्तरे अनेकदा स्थानिक अनुभवात दडलेली असतात. त्यामुळे "लोकांसाठी निर्णय" यापेक्षा "लोकांच्या सहभागातून निर्णय" ही लोकशाहीची अधिक प्रगल्भ भूमिका आहे. मच्छीमारांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करणे म्हणजे प्रशासनावर उपकार करणे नव्हे; तो त्यांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या निर्णयांमध्ये त्यांना मिळणारा लोकशाही अधिकार आहे. मच्छीमाराचे उत्पन्न निश्चित पगारासारखे नसते. मासळीचे प्रमाण, हवामान, पाण्याची परिस्थिती आणि बाजारभाव यावर त्याचे उत्पन्न अवलंबून असते. त्याच वेळी जाळी, होडी, इंजिन, इंधन, बर्फ, वाहतूक आणि बाजारपेठेतील विविध खर्च वाढत आहेत. मासे पकडणारा मच्छीमार हा संपूर्ण आर्थिक साखळीतील सर्वात महत्त्वाचा घटक असला तरी त्याला मिळणारा अंतिम आर्थिक लाभ अनेकदा मर्यादित राहतो. त्यामुळे मासे पकडण्यापासून थेट ग्राहकापर्यंतची मूल्यसाखळी मच्छीमारांच्या हातात आणणे ही भविष्यातील मोठी गरज आहे. मच्छीमार सहकारी संस्था, मत्स्यप्रक्रिया उद्योग, शीतसाखळी, थेट विक्री, ब्रँडिंग आणि आधुनिक बाजारव्यवस्था यांचा विकास झाला तर पारंपरिक व्यवसायाला आधुनिक आर्थिक बळ मिळू शकते.आज मच्छीमार समाजातील तरुणांसमोर एक वेगळे द्वंद्व आहे. एकीकडे त्यांना आपल्या पारंपरिक व्यवसायाचा अभिमान आहे; दुसरीकडे शिक्षण घेऊन आधुनिक क्षेत्रांमध्ये पुढे जाण्याची आकांक्षा आहे. मच्छीमार समाजातील मुलांनी शिक्षण, प्रशासन, उद्योग, तंत्रज्ञान, संशोधन, सहकार, राजकारण आणि सामाजिक नेतृत्व या क्षेत्रांत पुढे जाणे आवश्यक आहे. कारण समाजाचे भविष्य केवळ जलाशयात नाही; ते ज्ञानातही आहे. मच्छीमारांचा पर्यावरणाशी संबंध मूलतः संघर्षाचा नसून सहजीवनाचा आहे. जलसंपत्ती टिकली तरच त्यांचा व्यवसाय टिकणार आहे. म्हणूनच पारंपरिक मच्छीमारांना पर्यावरणीय संवर्धनाच्या प्रक्रियेत भागीदार बनविणे आवश्यक आहे. जलाशयाचे संवर्धन, मत्स्यप्रजातींचे संरक्षण, प्रदूषण नियंत्रण, शाश्वत मासेमारी आणि जैवविविधतेचे रक्षण यामध्ये मच्छीमारांचा प्रत्यक्ष सहभाग घेतला तर पर्यावरण संरक्षणाला स्थानिक पातळीवर अधिक प्रभावी आधार मिळू शकतो. लोकशाही राज्यव्यवस्थेचे अंतिम उद्दिष्ट नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा करणे हे आहे. त्यामुळे शासनाने मच्छीमारांकडे केवळ परवानगी घेणारा किंवा योजना मागणारा लाभार्थी म्हणून न पाहता जलसंपत्तीचा भागीदार म्हणून पाहणे आवश्यक आहे. धोरण तयार करताना स्थानिक वास्तव समजून घेणे, निर्णयापूर्वी संवाद साधणे, सामाजिक परिणामांचे मूल्यांकन करणे, पारदर्शक व्यवस्था निर्माण करणे आणि निर्णयानंतर परिणामांचे पुनर्मूल्यांकन करणे ही चांगल्या प्रशासनाची लक्षणे आहेत. मच्छीमारांसाठी स्वतंत्र पायाभूत सुविधा, बाजारपेठ, आर्थिक सहाय्य, विमा, प्रशिक्षण, आधुनिक मत्स्यतंत्रज्ञान आणि सहकाराच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण या बाबींकडे दीर्घकालीन दृष्टीने पाहण्याची गरज आहे. मच्छीमारांच्या प्रश्नाकडे केवळ एका समाजाच्या प्रश्नाप्रमाणे पाहणे ही देखील एक चूक आहे.नदीतील मासे बाजारात आले की त्यातून व्यापाऱ्याला रोजगार मिळतो. मासळी विकली जाते तेव्हा विक्रेत्याला उत्पन्न मिळते. वाहतूकदार, बर्फ विक्रेते, मासे कापणारे कामगार, हॉटेल व्यवसाय आणि अनेक लहान व्यावसायिक या साखळीशी जोडलेले असतात. म्हणून पारंपरिक मत्स्य व्यवसायाचे संरक्षण म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील एका संपूर्ण उपजीविका-साखळीचे संरक्षण होय. पाण्याचा प्रश्न शेवटी माणसाचा प्रश्न आहे. नदी ही केवळ पाण्याचा प्रवाह नाही. धरण हे केवळ पाण्याचा साठा नाही. मासे हे केवळ बाजारातील वस्तू नाहीत. आणि मच्छीमार हा केवळ श्रम करणारा मनुष्य नाही. या सर्वांमध्ये एक परस्परसंबंधित जीवनव्यवस्था आहे. म्हणूनच आजचा प्रश्न असा नाही की मच्छीमारांना बदलत्या काळाशी जुळवून घेता येईल का? प्रश्न असा आहे की बदलत्या काळाच्या नावाखाली आपण त्यांना त्यांच्या जीवनाच्या आधारापासून वंचित तर करत नाही ना? विकास हवा; परंतु तो माणसाला विस्थापित करणारा नसावा. आधुनिकीकरण हवे; परंतु ते परंपरेचे अस्तित्व नष्ट करणारे नसावे. जलसंपत्तीचा वापर हवा; परंतु तिच्या मूळ हितधारकांना बाजूला सारून नव्हे. शासनाचे धोरण हवे; परंतु त्या धोरणात माणसाचा चेहरा दिसला पाहिजे. कारण जलस्रोतांचे खरे मूल्य त्यांच्या पाण्यात नसते; त्या पाण्यावर किती जीवन जगते, किती कुटुंबे उभी राहतात आणि किती पिढ्यांचे भविष्य त्याच्याशी जोडलेले आहे, यात असते. पारंपरिक मच्छीमार समाजाचा प्रश्न म्हणून त्यामुळे आपण एक व्यापक प्रश्न स्वीकारला पाहिजे— "विकासाच्या प्रवाहात माणूस केंद्रस्थानी राहणार आहे की माणसाला प्रवाहाबाहेर केले जाणार आहे?" या प्रश्नाचे उत्तरच आपल्या जलधोरणाचे, विकासनीतीचे आणि सामाजिक न्यायाचे खरे मूल्य ठरवेल.



**प्रा. कृष्णात जयवंत नगरे**
**तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र विभाग**
**प्रमुख,तुळजाराम चतुरचंद**
**महाविद्यालय बारामती**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ सप्टेंबर २०२६


## केंद्राच्या मदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांना मदत करणार, मंत्र्यासह, विविध यंत्रणा बांधावर जाणार

**मुंबई** : राज्यातील काही भागातील दुष्काळसदृश्य परिस्थितींवर उपायोजनांसाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात येत आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केली. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्र सरकारच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाकडून मदत केली जाईल. तसेच दुष्काळासंदर्भात येत्या शनिवारपर्यंत प्राथमिक अधिसूचना जारी केली जाईल, असेही मुख्यमत्र्यांनी सांगितले. आज राज्य मंत्रिमंडळाची मंत्रालयात बैठक झाली. बैठकीत राज्यातील पावसाचे प्रमाण, धरणातील पाणीसाठा, शेतीची परिस्थितीबाबत सविस्तर चर्चा झाली. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला, त्यावेळी ही माहिती दिली. मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील दुष्काळासंदर्भातील प्राथमिक माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे. या माहितीच्या आधारे शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी गतीने निर्णय घेता यावे, यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला मंत्रिमंडळाचेच अधिकार असतील. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली या समितीमध्ये जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मदत व पुनर्वसन मकरंद जाधव पाटील आदी मंत्र्यांचा समावेश आहे. मुख्य सचिव राजेश अगरवाल या समितीचे सदस्य सचिव असतील. राज्यभरातून येणाऱ्या माहितीच्या आधारे कोणत्या भागात दुष्काळ आहे, तिथे काय मदत व उपायोजना करायची याबाबत ही समिती निर्णय घेईल. उद्यापासून राज्यात दुष्काळसदृश्य भागात पंचनामे सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सोयाबीन, मका, कापूस आदी पिकांना सर्वाधिक फटका बसला असून कोकणातील भातशेतीवरही दुष्काळाचा विपरित परिणाम झाला आहे. राज्यातील दुष्काळसदृश्य भागाची उद्यापासून मी स्वत: पाहणी करणार असून मंत्री आणि लोकप्रतिनीधींनाही बांधावर जाऊन पाहणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांना मदतीसाठी एनडीआरएफच्या निकषानुसार केंद्र सरकारकडे मदतीबाबतचा प्रस्ताव पाठवणार असल्याचेही, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी चारा यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. आगामी सात ते आठ महिन्यांचे नियोजन केले जाणार आहे. पिण्याच्या पाण्यासाठी राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या समन्वयातून हे नियोजन केले जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले. आगामी काळात स्पर्धा परीक्षेसाठी विक्रमी जागाराज्यात नजिकच्या काळात स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विक्रमी पदांची भरती केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. स्पर्धा परीक्षेच्या बाबतीत अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखालील समिती राज्यात सर्वत्र जात आहे. विद्यार्थी आणि इतर संबंधितांशी संवाद साधत त्यांचे म्हणणे आणि सूचना जाणून घेत आहेत. ही समिती अतिशय चांगले काम करत असून समितीच्या अहवालाच्या शिफारशीबाबत शासन सकारात्मक असेल, असेही त्यांनी सांगितले. या समितीसमोर परीक्षा पद्धती वर्णनात्मक (डिस्क्रीप्टीव्ह) ऐवजी बहुपर्यायी (ऑब्जेक्टिव्ह) पद्धतीने घेतली जावी, अशी मागणी जोरकसपणे मांडण्यात येत आहे. दळवी समितीने परीक्षा पद्धती बहुपर्यायी ऐवजी वर्णनात्मक घेण्याची सूचना केली होती, त्यानुसार निर्णय घेण्यात आला होता. आता याबाबत व्ही. राधा समितीच्या शिफारशीनुसार विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसंदर्भात शासन निर्णय घेण्याबाबत सकारात्मक असेल. गट क वर्गाबाबत पदांची संख्या अल्प असल्याची तक्रार होत असते. परंतु नजीकच्या काळात गट वर्गाबरोबरच सर्व संवर्गातील पदे विक्रमी प्रमाणावर भरण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदभरतीसाठी स्वतंत्र व्यवस्था राबवण्याचा किंवा ही भरती देखील एमपीएससीमार्फत करण्याचा निर्णयही लवकरच घेतला जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.




## मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त)

**बीड (भगवंत पाळवदे)** : राज्यातील दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांसाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन. महसूल मंत्री अध्यक्ष. वेळोवेळी घ्याव्या लागणाऱ्या निर्णयासाठी मंत्रिमंडळ उपसमितीला सर्वाधिकार. येत्या शनिवारपर्यंत प्राथमिक अधिसूचना काढण्यात येणार. मंत्री बांधावर जाऊन पाहणी करणार. शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहचवण्याच्या कामात गतीमानता येणार. (मदत व पूनर्वसन विभाग)मुंबई मेट्रो मार्ग ४, ४ अ व १० प्रकल्पाच्या एकात्मिक कार शेड डेपो करिता जमीन दिलेल्या मौजे मोघरपाडा येथील प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना मालकी हक्काने विकसित भूखंड वाटप करण्यास मंजुरी. मोघरपाडा सर्व्हे क्र. ३० मधील शेतकऱ्यांना २२.५ टक्के व १२.५ टक्के विकसित भूखंड वाटप होणार.(नगर विकास विभाग)मुंबईतील खार (प) येथील रामकृष्णनगर मधील म्हाडाच्या इमारतींचा एकत्रित पुर्नविकास होणार. पायाभूत सुविधा दर्जेदार मिळाव्यात यासाठी या परिसरातील जुन्या आणि मोडकळीस आलेल्या या इमारतींचा समूह पुनर्विकास होणार. (गृहनिर्माण विभाग)धुळे शहराच्या मंजूर विकास योजनेतील धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे देवपूर (ता. धुळे) येथील सर्व्हे क्र. १०३ वरील क्रीडांगण व बगीचा यांचे आरक्षण रद्द करून, ते सार्वजनिक – निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करण्यास मान्यता (नगर विकास विभाग)कृषि विभागाचा सुधारित आकृतीबंध रद्द. सन २००९ चा मंजूर आकृतीबंध तात्पुरता कायम राहणार. सुधारित आकृतीबंधाचा फेरप्रस्ताव सादर करण्यासाठी कृषी विभागाच्या कार्यभाराचा, उपलब्ध मनुष्यबळाचा, रिक्त पदांचा, विविध संवर्गाच्या आवश्यकता, क्षेत्रीय यंत्रणेची गरज, शेतकरी केंद्रीत योजनांचा कार्यभार तसेच भविष्यातील प्रशासकीय गरजा यांचा सर्वंकष आढावा घेण्यात येणार (कृषि विभाग)

## राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत संस्कृती पाळवदे द्वितीय



**बीड (भगवंत पाळवदे)** : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी मतदानाचा हक्क, वारसा हक्क, प्रसूती रजेचा हक्क, इत्यादी केलेले कार्य या विषयावर राज्यस्तरीय निबंधलेखन स्पर्धेत ITI डिप्लोमा महाविद्यालय / MCVC गटातून बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील वंदेमातरम महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.संस्कृती उषा भगवंतराव पाळवदे यांच्या उत्कृष्ट लेखनकौशल्याची, वैचारिक प्रगल्भतेची व स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने कु.संस्कृती पाळवदे यांची द्वितीय विजेता म्हणून सर्वानुमते निवड केल्याचे जाहीर केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कु.संस्कृती पाळवदे यांना दि.२९सप्टेंबर २०२६ मंगळवार रोजी मुंबईला विजेत्यांच्या गौरव व बक्षीस वितरण समारंभात निमंत्रित करून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य विभागाचे मंत्री महोदय मा.श्री.मंगलप्रभातजी लोढा साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे ! त्यामुळे कु.संस्कृती पाळवदे यांचे सर्वत्र हार्दिक अभिनंदन होत आहे !भविष्यातही कु.संस्कृती पाळवदे यांचे उत्कृष्ट लेखनकौशल्य, वैचारिक प्रगल्भता वंचित समाजाच्या प्रगतीसाठी कामी येवो !शुभेच्छुक : प्राचार्या, संस्थापक सचिव, टेक्निशिअन कैवल्य, संपूर्ण स्टाफ, सर्वच विद्यार्थी, पालक, नातेवाईक, इत्यादीयाचे डिजिटल बॅनर द्यावे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ सप्टेंबर २०२६


## जिंतूर येथे साईनाथ महाराज वसमतकर यांच्या हस्ते रुग्णांना मोफत डबे वाटप व स्वच्छता अभियान



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : "स्वच्छता, अन्नदान, वृक्ष लागवड अन् ज्ञानदानानेच कलियुगात जीवनाचे सार्थक!"राष्ट्रसंत सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर यांचे प्रतिपादन; ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना डबे वाटप, महापुरुषांच्या पुतळा परिसरात स्वच्छता मोहीम घेण्यात आली.दि 22 "कलियुगात मानवी जन्माचे सार्थक करायचे असेल, तर केवळ स्वतःचा विचार न करता स्वच्छता, वृक्ष लागवड, अन्नदान आणि ज्ञानदान या चतुःसूत्रीचा अवलंब केला पाहिजे. या सत्कार्यांतूनच समाजाची खऱ्या अर्थाने उभारणी होते," असे रोखठोक प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे ब्रँड अँम्बेसिडर, स्वच्छतादूत तथा आयटीआयचे प्रमुख मार्गदर्शक (महाराष्ट्र शासन) प.पू. राष्ट्रसंत सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर यांनी येथे केले.जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयात मंगळवार, 22 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजता रुग्णांना मोफत डबे वाटपाचा स्तुत्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.महापुरुषांच्या पुतळा परिसराची स्वच्छताकार्यक्रमापूर्वी साईनाथ महाराज यांनी आपल्या दत्तभक्तांसह स्वतः हातात झाडू घेऊन वसंतराव नाईक पुतळा, अण्णाभाऊ साठे पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर स्वच्छ केला. या सर्व महापुरुषांना अभिवादन करून स्वच्छता अभियान राबवण्यात आले.रुग्णांना मोफत डब्यांचे वाटप जिंतूर ग्रामीण रुग्णालयातील गरजू रुग्णांना मान्यवरांच्या हस्ते मोफत अन्नधान्य व जेवणाचे डबे वाटप करण्यात आले. या वेळी साईनाथ महाराजांनी उपस्थितांना विविध उदाहरणे देऊन स्वच्छता, वृक्ष लागवड, अन्नदान आणि ज्ञानदानाचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले.आयटीआय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन जिंतूर-औंढा रस्तनावरील पुंगळा एम.आय.डी.सी. परिसरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (ITI) विद्यार्थ्यांना साईनाथ महाराजांच्या हस्ते मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच समाजभान जपावे, असा संदेश त्यांनी या वेळी दिला.मान्यवरांची उपस्थितीया कार्यक्रमास जिंतूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय मस्के, युवा नेते बाळासाहेब देशमुख, माजी नगरसेवक गणेश कुरे, अशासकीय सदस्य जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद परभणी ज्येष्ठ पत्रकार मंचक देशमुख, सचिन रायपत्रीवार, संदीप माहूरकर, भागवत चव्हाण, शेख रहीम यांच्यासह बहुसंख्य नागरिक व भाविक उपस्थित होते.

## जिंतूरमध्ये रास्तारोको प्रकरणी गुन्हा; १६ जणांसह २००० ते २५०० आंदोलनकर्तेवर आरोप



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : जिंतूर-जालना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ वर वसंतराव नाईक पुतळ्यासमोर रास्तारोको आंदोलन केल्याप्रकरणी जिंतूर पोलिसांनी विनोद विश्वनाथ आडे यांच्यासह १६ जणांची नावे नमूद करून अंदाजे २००० ते २५०० इतर आंदोलनकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांच्या फिर्यादीनुसार, २१ सप्टेंबर रोजी दुपारी १.३० ते ३.२० वाजेदरम्यान संबंधित ठिकाणी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणात विनोद विश्वनाथ आडे, उत्तम सोमला जाधव, देविदास हरसिंग राठोड, अॅड. विनोद गोपीचंद राठोड, विशाल हरीलाल चव्हाण, विजय लक्ष्मण आडे, प्रा. संदेश चव्हाण, दीपक वसंतराव चव्हाण, संजय मिठु राठोड, शंकर जाधव, पांडुरंग आढे, अक्षय ऊर्फ अक्की चव्हाण, विश्वनाथ आढे, माधव गुलाब चव्हाण आणि लखन जाधव यांची नावे आरोपी म्हणून नमूद करण्यात आली आहेत.पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आंदोलनादरम्यान लाठ्या-काठ्या घेऊन ट्रकची तोडफोड करण्यात आली असून, त्याच्या काचा फुटल्याने अंदाजे २० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तसेच सार्वजनिक शांततेचा भंग आणि दंगलीसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे.फिर्यादीत पुढे नमूद केल्यानुसार, आंदोलनकर्त्यांपैकी विनोद विश्वनाथ आडे यांनी स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून घेतल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. तसेच पोलिसांनी दिलेल्या कायदेशीर आदेशाचे आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचेही गुन्ह्यात नमूद करण्यात आले आहे.परभणी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांच्या १५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या आदेशानुसार महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अन्वये १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत निर्बंध लागू असताना हे आंदोलन झाल्याचे पोलिसांनी फिर्यादीत नमूद केले आहे.या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५५३/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमे तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधाकर नारायणराव चव्हाण यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी करीत आहेत.वरील मजकूर पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यातील माहितीनुसार आहे. नमूद आरोप अद्याप तपासाधीन असून, त्याबाबत अंतिम सत्यता न्यायालयीन प्रक्रियेत निश्चित होईल.







महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २३ सप्टेंबर २०२६

# सदरक्षणाय: खलनिग्रहणाय: आदर्शांची पडझड आणि कटू वास्तव

भारतीय समाजातील सर्वसामान्य नागरिकांसाठी राज्याचा चेहरा म्हणजे पोलीस. आणि हा चेहरा बहुतांश वेळा निव्वळ दहशतीचा असतो. रस्त्याच्या कोपऱ्यावर उभ्या असलेल्या पोलिसांपासून, पोलीस ठाणे, रस्त्यावरील अडथळे (बॅरिकेड्स) किंवा चौकशीची खोली—यांच्या माध्यमातूनच सामान्य नागरिकाचा राज्याशी संबंध येतो. ज्येष्ठ पत्रकार कुलदीप नायर यांनी एकदा निरीक्षण नोंदवले होते की, सामान्य माणसाचा पोलिसांशी येणारा पहिला संबंध बहुधा शिवीगाळ आणि दंडुक्यानेच सुरू होतो. राज्यघटनेने नागरिकांना अनेक अधिकारांचे आश्वासन दिले असले तरी पोलिसांना पाहताच हे अधिकार जणू हवेत विरून जातात. विरोधाभास असा की, पोलिस नेहमीच आपल्या ब्रीदवाक्यात 'सेवेची' भाषा वापरतात. उदाहरणार्थ, दिल्ली पोलिस "शांती, सेवा, न्याय" अशी घोषणा करतात, तर महाराष्ट्र पोलिस "सद्रक्षणाय खलनिग्रहणाय" हे संस्कृत ब्रीदवाक्य मिरवतात, ज्याचा अर्थ सुशिक्षितांना समजणेही कठीण जाते. याचा अर्थ "सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा संहार." असा होतो. "सेवा, सुरक्षा, न्याय" हेही अनेकदा आदर्श पोलीसव्यवस्थेचे ध्येय म्हणून मांडले जाते. प्रत्यक्षात मात्र सामान्य नागरिकांसाठी पोलीस अनेकदा याच्या अगदी उलट भूमिका बजावताना दिसतात. सेवेची ही भाषा प्रामुख्याने श्रीमंत आणि सत्ताशाली अशा मूठभर वर्गासाठीच लागू असल्याचे दिसते. सामान्य माणसाचा अपमान करणे आणि त्याच्याशी गैरवर्तन करणे हे पोलिसांच्या दैनंदिन कार्यपद्धतीचे भाग बनले आहेत. क्रूरताही काही असामान्य राहिलेली नाही; गुन्ह्याची कबुली मिळवण्यासाठी आणि निरपराध व्यक्तींना गुन्ह्यात अडकवण्यासाठी पोलिसांकडून कोठडीत मारहाण केली जाते. मुंबईतील कुख्यात ७/११ रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरण याचे अंगावर काटा आणणारे उदाहरण आहे. ११ जुलै २००६ रोजी मुंबईच्या उपनगरीय रेल्वेगाड्यांमध्ये सात बॉम्बस्फोट झाले, ज्यात १८९ निरपराध मारले गेले आणि ८०० हून अधिक जखमी झाले. या प्रकरणात अनेक मुस्लिम तरुणांना ताब्यात घेण्यात आले आणि त्यांनी न केलेल्या गुन्ह्याची कबुली देण्यासाठी त्यांच्यावर अमानुष अत्याचार करण्यात आल्याचा आरोप झाला. १३ जणांवर खटला चालवला गेला; २०१५ मध्ये १२ जणांना दोषी ठरवून त्यांपैकी पाच जणांना फाशी आणि सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. मात्र, जुलै २०२५ मध्ये, मुंबई उच्च न्यायालयाने फिर्यादी पक्षाला त्यांचा गुन्हा संशयापलीकडे सिद्ध करता आला नाही असे नमूद करत सर्व १२ आरोपींची निर्दोष मुक्तता केली. त्यांच्या विरोधातील आरोप वाजवी संशयापलीकडे सिद्ध करण्यात अभियोजन पक्ष अपयशी ठरल्याचे न्यायालयाने नमूद केले. काहींनी आयुष्याची तब्बल १९ वर्षे तुरुंगात घालवली होती. न्यायालयाने सरकारी पक्षाच्या पुराव्यांमध्ये—विशेषतः साक्षीदारांची विश्वासार्हता आणि दबावातून घेतलेल्या कबुलीजबाबांमध्ये—गंभीर त्रुटी शोधून काढल्या. बचाव पक्षाचा आरोप होता की, हे जबाब छळ करूनच लिहून घेण्यात आले होते. निर्दोष मुक्त झालेल्यांपैकी अब्दुल वाहिद शेख यांनी पुढे 'इनोसंट प्रिझनर' (Innocent Prisoner) नावाचे पुस्तक लिहिले, ज्यामध्ये त्यांनी कबुलीजबाब मिळवण्यासाठी पोलिसांनी केलेल्या छळाचे तपशीलवार वर्णन केले आहे. आयपीएस अधिकारी सुनील रामानंद यांच्या 'कॉप्स इन अ क्वॅगमायर' (Cops in a Quagmire) या काल्पनिक पुस्तकाचे परीक्षण मी 'द वायर'साठी केले होते; त्यातही हाच मुद्दा मांडण्यात आला होता. 'कोठडीतील छळ बेकायदेशीर आहे हे प्रत्येकाला ठाऊक आहे, तरीही त्याला सर्वसामान्य आणि स्वीकारार्ह बाब म्हणून पाहिले जाते.' भारतीय कायद्यानुसार कोठडीतील अत्याचार हा मूलभूत अधिकारांचा, विशेषतः संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जीवन, प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्याचे गंभीर उल्लंघन मानतो. तरीही भारतात सरकारी अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या छळ/अत्याचाराला स्वतंत्रपणे गुन्हा ठरवणारा सर्वसमावेशक स्वतंत्र 'अँटी-टॉर्चर' (छळविरोधी) कायदा अस्तित्वात नाही. त्याऐवजी संरक्षणासाठी संविधान, सर्वसाधारण फौजदारी कायदे, प्रक्रियात्मक सुरक्षा आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश यांवर अवलंबून राहावे लागते. परंतु हे उपाय अत्यंत अपुरे ठरले आहेत. डी.के. बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य (१९९७) या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने कोठडीतील हिंसाचाराला 'सरकारी सत्तेचा अत्यंत विकृत गैरवापर' म्हटले होते आणि अटक व कोठडीबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली होती. कोठडीत असलेल्या व्यक्तीचे रक्षण करणे ही राज्याची घटनात्मक जबाबदारी आहे, हे न्यायालयाने स्पष्ट केले होते. हे तत्व नुकतेच पुन्हा अधोरेखित करण्यात आले आहे. जुलै २०२५ च्या एका निकालात, कोठडीतील अत्याचाराला बळी पडलेल्या व्यक्तीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, राज्ययंत्रणेने कलम २१ चे उल्लंघन केल्यास घटनात्मक भरपाई दिली जाऊ शकते. तसेच कोठडीतील हिंसेची निष्पक्ष आणि प्रभावी चौकशी करण्याची गरजही न्यायालयाने अधोरेखित केली. जरी 'कोठडीतील छळ' (custodial torture) असा स्वतंत्र गुन्हा नमूद नसला, तरी 'भारतीय न्याय संहिता' (BNS) अशा कृत्यांना गुन्हेगारी मानत शिक्षेची तरतूद करते—ज्यामध्ये स्वेच्छेने दुखापत किंवा गंभीर दुखापत पोहोचवणे, घातक साधनांचा वापर, कबुली मिळवण्यासाठी इजा करणे आणि बेकायदेशीरपणे डांबून ठेवणे यांचा समावेश होतो. त्यामुळे कबुलीजबाब मिळवण्यासाठी कैद्याला मारहाण करणारा पोलिस अधिकारी तपासाची कायदेशीर पद्धत वापरत नसून तो थेट गुन्हा करत असतो. या समस्येचे गांभीर्य आकडेवारीतूनही स्पष्ट होते.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या (NHRC) आकडेवारीनुसार, २००४- ०५ ते २०१३-१४ या यूपीए सरकारच्या दहा वर्षांच्या काळात पोलीस कोठडीत १,३९३ मृत्यू झाले. त्यानंतरच्या २०१४- १५ ते २०२३-२०२४ या दहा वर्षांत ही संख्या १,५१५ झाली. म्हणजे मोदी सरकारच्या काळात सरासरी जवळपास ९ टक्क्यांची वाढ झाली. नोंदवलेल्या पोलिस अत्याचारांची आकडेवारीही चिंताजनक आहे. NHRC च्या आकडेवारीवर आधारित २०१६ मधील लोकसभा उत्तरानुसार, पोलिस अत्याचारांची प्रकरणे २०१३-१४ मध्ये ३०३ वरून २०१४-१५ मध्ये १३४ आणि २०२५ २०१५- १६ मध्ये ४९३ झाली. त्याच वर्षांमध्ये पोलीस कोठडीतील मृत्यू अनुक्रमे १४०, १३० आणि १५३ होते. त्यानंतरच्या आकडेवारीतही लक्षणीय सुधारणा झाल्याचे दिसत नाही. एनएचआरसीने २०२१-२२ मध्ये १७५, २०२२-२३ मध्ये १६८ आणि २०२३-२४ मध्ये १६० कोठडीतील मृत्यूंची नोंद केली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अहवालानुसार २०२४-२५ मध्ये १४०, तर २०२५-२६ च्या पहिल्या ७४ दिवसांतच १७० मृत्यू झाले. याहूनही चिंतेची बाब म्हणजे शासकीय आकडेवारीतच प्रचंड तफावत आढळते. 'स्टेटस ऑफ पोलिसिंग इन इंडिया रिपोर्ट २०२५' ने NCRB, NHRC आणि नागरी संघटनांच्या आकडेवारीत लक्षणीय विसंगती नोंदवली असून अनेक घटना दडपल्या जात असल्याचे म्हटले आहे. जनमानसातील प्रतिमा जपण्यासाठी आकडेवारीत फेरफार करणे हे सध्याच्या सत्ताधाऱ्यांचे धोरण राहिले आहे. भारताने संयुक्त राष्ट्रांच्या छळविरोधी करारावर (UN Convention Against Torture) स्वाक्षरी केली आहे, पण त्याचे अद्याप प्रमाणीकरण केलेले नाही, आणि संसदेनेही छळविरोधी कोणताही सर्वसमावेशक कायदा केलेला नाही. त्यामुळे कोठडीतील छळाची स्वतंत्र व्याख्या करणारी किंवा त्याच्या तपासासाठी विशेष कार्यपद्धती पुरवणारी कोणतीही वैधानिक व्यवस्था देशात नाही. पोलिसी क्रूरता ही केवळ काही वैयक्तिक पोलिसांची समस्या नसून ती खुद्द पोलिस यंत्रणेच्या आणि राज्यसत्तेच्या स्वरूपाची समस्या आहे, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. १९४७ मध्ये सत्ता बदलली. परंतु, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्याचे वलय असलेल्या नव्या राज्यकर्त्यांनी तीच वसाहतवादी राज्ययंत्रणा पुढे चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. देशाच्या भीषण फाळणीच्या पार्श्वभूमीवर हे एका अर्थाने समजण्यासारखे होते. पण त्यावेळी तयार होत असलेल्या संविधानाकडून ही यंत्रणा एका प्रजासत्ताक रचनेत बदलली जाईल अशी अपेक्षा होती. मात्र संविधानाने स्वतःच शेवटच्या वसाहतवादी कायद्यातील म्हणजेच 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५' मधील बऱ्याच तरतुदी स्वीकारल्या आणि बहुतांश कायदे न बदलता पूर्वीच्या राज्ययंत्रणेलाच मान्यता दिली. १८५७ च्या उठावानंतर वसाहतवादी नियंत्रण घट्ट करण्यासाठी तयार करण्यात आलेला 'पोलिस कायदा, १८६१' हाच स्वातंत्र्योत्तर पोलिसांचा संस्थात्मक पाया राहिला. ब्रिटिश परकीय सत्तेला विरोध करणाऱ्या जनतेला चिरडण्यासाठी निर्माण केलेले पोलिस दल हे त्या वसाहती व्यवस्थेचे दमनाचे साधन होते. याचा अर्थ असा नाही की पोलीस सुधारणा करण्याचे प्रयत्न झाले नाहीत. १९७० च्या दशकापासून हे प्रयत्न सुरू झाले, परंतु पोलिसांवरील राजकीय नियंत्रण सोडण्याची राजकीय इच्छाशक्ती कधीच दिसली नाही. ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ एम. एस. गोरे यांच्या अध्यक्षतेखालील 'गोरे समितीने' (१९७१-७३) पोलिस प्रशिक्षणाचा अभ्यास करून व्यापक संरचनात्मक त्रुटी मांडल्या. त्यांनी १८६ शिफारसी केल्या, त्यापैकी ४५ पोलिस सुधारणांशी संबंधित होत्या. पण त्यांच्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. त्यानंतरही अनेक आयोग आणि समित्यांनी याच समस्येचे निदान केले— राजकीय हस्तक्षेप, व्यावसायिक स्वायत्ततेचा अभाव, जबाबदारीची वानवा आणि वसाहतवादी हुकूमशाही रचना. १९७० च्या उत्तरार्धात 'राष्ट्रीय पोलिस आयोगाने' यावर अहवाल दिला. माजी पोलिस अधिकारी ज्युलिओ रिबेरो, माजी आयएएस अधिकारी के. पद्मनाभय्या आणि कर्नाटक व केरळ उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती व्ही. एस. मलिमथ यांनी १९९० आणि २००० च्या दशकात या मुद्द्याचा फेरआढावा घेतला. २००६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'प्रकाश सिंह' प्रकरणात यातील अनेक शिफारशींचे रूपांतर बंधनकारक निर्देशांमध्ये केले. तरीही तीच जुनी व्यवस्था टिकून राहिली. विरोधाभास असा आहे की, सरकारे वारंवार व्यावसायिक आणि लोकाभिमुख पोलिसव्यवस्थेची गरज व्यक्त करतात; पण पोलिसांना राजकीय दबावापासून मुक्त करणाऱ्या सुधारणा करण्यास मात्र विरोध करतात. पक्षपाती पोलीसव्यवस्था हा एका अशा व्यवस्थेचा परिणाम आहे जिचे वारंवार रोगनिदान झाले, न्यायालयातून बदल करण्याचे आदेश आले, परंतु राजकीय हेतूंसाठी ती तशीच जपून ठेवली गेली. स्वातंत्र्योत्तर पोलिसांनी वसाहतवादी मानसिकता, पद्धती आणि संस्थात्मक धारणा बऱ्याच अंशी तशाच जपल्या. संविधानाने राज्याला प्रजासत्ताक स्वरूप दिले आणि जनतेला सार्वभौम मानले, तरी पोलिसव्यवस्थेचा हा वारसा कायम राहिला. वसाहतवादी राज्यकर्त्यांना आपले साम्राज्य टिकवण्यासाठी एक स्थिर, अंदाज बांधता येण्याजोगी आणि व्यावसायिक प्रशासकीय व्यवस्था हवी होती—प्रजेविषयीच्या दयेपोटी नव्हे, तर प्रभावी नियंत्रणासाठी. दुसरीकडे, दर पाच वर्षांच्या निवडणूक चक्रात अडकलेल्या स्वातंत्र्योत्तर राज्यकर्त्यांना आपल्या राजकीय फायद्यासाठी आणि संरक्षणाच्या बदल्यात प्रशासन व पोलिसांचा वापर करण्याचे अधिक प्रलोभन होते. राजकीय नेत्यांना स्थानिक गुन्हेगारांमध्ये सोयीचे साथीदार सापडले; ज्यांनी निवडणुकीत मते मिळवून दिली आणि विरोधकांना धमकावले. बदल्यात या गुन्हेगारांना कायद्यापासून वाचण्यासाठी राजकीय संरक्षणाची गरज होती. काळाच्या ओघात या परस्पर संबंधांतून 'राजकारणी-नोकरशहा-पोलिस-गुन्हेगार' यांची अभद्र युती तयार झाली. २०१४ मध्ये केंद्रात भाजप सत्तेवर आल्यावर आणि गुजरातमध्ये १२ वर्षे अनियंत्रित व हुकूमशाही पद्धतीने राज्य चालवणारे नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर या संस्था पत्त्यांच्या बंगल्यासारख्या कोसळल्या. पोलिस ही संस्था मुळातच उजव्या विचारसरणीच्या राजकारणाला पोषक ठरणारी असते. ती एक उतरंड असलेली आणि हुकूमशाही प्रवृत्तीची संस्था आहे, जी त्याच बहुसंख्याक समाजातून आलेली असते. तिची कार्यसंस्कृती शिस्त, आज्ञापालन आणि अधिकाराला महत्त्व देते; तर राजकीय सत्ताधाऱ्यांवरील अवलंबित्व बदल्या, पदोन्नती आणि संरक्षणासाठी सत्तेशी जुळवून घेणाऱ्यांनाच बक्षीस देते. हिंदू राष्ट्रवाद अशा प्रकारची वैचारिक भाषा उपलब्ध करून देतो, ज्यात असहमती म्हणजे अव्यवस्था, तर अल्पसंख्याकांना संशय व सुरक्षेच्या संकुचित दृष्टिकोनातून पाहिले जाते. राजकीय पाठबळ या सांस्कृतिक जवळीकीचे रूपांतर संस्थात्मक वर्तनात करते. यातून अशी पोलिस यंत्रणा उभी राहते जी सत्ता, बहुसंख्याक राष्ट्रवाद आणि दडपशाहीचे गोडवे गाणाऱ्या राजकारणाला सहज बळी पडते. भाजपच्या राजवटीत पोलिसांनी आणखी धोकादायक राजकीय स्वरूप धारण केले आहे. ती आता केवळ प्रशासकीय अधिकाराचे साधन उरलेली नसून तीव्र ध्रुवीकरणाच्या राजकीय वातावरणात वापरली जाणारी पक्षपाती फौज बनली आहे. उजव्या विचारसरणीच्या प्रत्येक मोहिमेत—मग ती 'घरवापसी' असो, 'लव्ह जिहाद', 'गो-तस्करी', 'बुलडोझर न्याय' असो किंवा निवडणुका— पोलिसांनी भाजपच्या बाजूने थेट भूमिका बजावली आहे. २०१४ पासून भाजपच्या बाजूने पोलिसांच्या पक्षपातीपणाची अनेक उदाहरणे आहेत. २०२० च्या सीएए (CAA) विरोधी आंदोलनादरम्यान, भाजप नेते कपिल मिश्रा यांनी दिल्ली पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या बाजूला उभे राहून आंदोलकांना हटवण्यासाठी पोलिसांना जाहीर धमकी दिली. दुसऱ्याच दिवशी जातीय हिंसाचार उसळला. नंतर दिल्ली उच्च न्यायालयाने प्रक्षोभक भाषणांवर भाजप नेत्यांवर एफआयआर (FIR) न नोंदवल्याबद्दल पोलिसांना खडसावले. तरीही, संशयित मुस्लिम विद्यार्थी तुरुंगात सडत असून त्यांच्या अटकेचे हे सहावे वर्ष आहे. जेएनयूमध्ये ५ जानेवारी २०२० रोजी, पोलिसांना २३ फोन कॉल्स जाऊनही, एका मुखवटाधारी जमावाने विद्यार्थी आणि शिक्षकांवर तासनतास हल्ले केले; पण पोलिसांनी कॅम्पसमध्ये प्रवेश करण्यास जाणीवपूर्वक उशीर केला. नंतरच्या अंतर्गत चौकशीत पोलिसांनी स्वतःलाच क्लिन चिट दिली. २०२३ मध्ये, एका अल्पवयीन मुलीसह सात महिला कुस्तीपटूंनी लैंगिक छळाचा आरोप करूनही दिल्ली पोलिसांनी भाजप खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्यास नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतरच गुन्हा दाखल झाला; तोपर्यंत आंदोलक कुस्तीपटूंनाच फरफटत नेऊन ताब्यात घेतले गेले. तसेच जहांगीरपुरीमध्येही मागील वर्षीच्या जातीय हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर रामनवमीच्या मिरवणुकीला परवानगी नाकारण्यात आली होती. तरीही पोलिसांनी हिंदुत्ववादी गटांमधील सुमारे १००० लोकांना भगवे झेंडे आणि घोषणांसह मिरवणूक काढण्याची परवानगी दिली. दिल्लीतील 'सीजेपी'च्या जंतरमंतरवरील आंदोलनादरम्यान आणि त्यानंतर घडलेल्या घटनांनी पोलिसांचा भाजपधार्जिणा चेहरा पुन्हा उघडा पाडला. २० जुलै रोजी जेव्हा आंदोलक केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी संसदेवर मोर्चा काढत होते, तेव्हा दिल्ली पोलिसांनी विद्यार्थ्यांवर अमानुष बळाचा वापर केला. 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल'ने व्हिडिओ पुराव्यांच्या स्वतंत्र तपासणीनंतर या कारवाईवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. लाठ्या आणि खिळे ठोकलेल्या दंडुक्यांशिवाय पोलिसांनी अश्रुधूर आणि पॅलेट गनचा वापर केला. पोलिसांनी सुरुवातीला पॅलेट गनचा वापर नाकारला असला तरी वैद्यकीय अहवालात पॅलेटच्या जखमांची नोंद झाली. १९ वर्षीय साहिल लोचब याच्या डोळ्याला पॅलेटच्या गोळ्या लागून गंभीर इजा झाली. त्याच्या कुटुंबीयांनी एफआयआर नोंदवण्यासाठी धाव घेतली असता पोलिसांनी स्पष्ट नकार दिला. यानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काँग्रेस नेत्यांसह पार्लमेंट स्ट्रीट पोलिस ठाण्याबाहेर तब्बल सात तास धरणे धरले, तेव्हा कुठे पोलिसांनी गुन्हा नोंदवला. एखाद्या घटनात्मक लोकशाहीसाठी ही घटना अत्यंत लाजीरवाणी आहे. जंतरमंतरवरील आंदोलनात दिल्ली पोलिसांनी 'फेशिअल-रेकग्निशन' (चेहरा ओळखण्याच्या) तंत्रज्ञानाचा केलेला वापर गंभीर घटनात्मक प्रश्न निर्माण करतो. 'के. एस. पुट्टास्वामी' प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की गोपनीयतेच्या अधिकारावरील कोणत्याही अतिक्रमासाठी तीन अटी आवश्यक आहेत: कायदेशीर अधिष्ठान, राज्याचा वैध हेतू आणि प्रमाणबद्धता. आंदोलकांवर बायोमेट्रिक पाळत ठेवण्यासाठी कोणताही स्पष्ट वैधानिक आधार असल्याचे किंवा ही पाळत आवश्यक आणि प्रमाणबद्ध होती हे पोलिस सिद्ध करू शकलेले नाहीत. पोलिसांच्या स्वतःच्या दाव्यांमुळेच या घटनात्मक आक्षेपांना पुष्टी मिळते: त्यांनी दावा केला की या यंत्रणेने आंदोलनाच्या ठिकाणी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या २,८७३ व्यक्तींची ओळख पटवली असून पडताळणीनंतर कारवाई केली जाईल. मात्र तपासात असे निष्पन्न झाले की त्या ओळख पटवलेल्यांपैकी किमान २५ जण जंतरमंतरवरील आंदोलनाच्या वेळी आधीच तुरुंगात बंद होते. दलित विद्यार्थी आंदोलक निशू आझाद यांचे वडील संजय कुमार यांचे प्रकरणही पोलिसांच्या पक्षपाती भूमिकेचे आणखी एक उदाहरण आहे. जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान कुमार यांच्यावर स्वतःला हिंदुत्ववादी कार्यकर्ता म्हणवणाऱ्या स्वतंत्र भारद्वाज याने प्राणघातक हल्ला केला. भारद्वाजने नंतर एका पॉडकास्टमध्ये उघडपणे शेखी मिरवली की त्याने निशूच्या वडिलांचे डोके फोडले आणि तरीही राजकीय लागेबांध्यांमुळे तो अटकेपासून वाचला. गुन्ह्याची जाहीर कबुली देणाऱ्या आरोपीवर कारवाई करण्याऐवजी दिल्ली पोलिसांनी जखमेचे गांभीर्य कमी दाखवण्याचा प्रयत्न केला. पोलीस ठाण्याबाहेर पुन्हा आंदोलन छेडल्यानंतरच पोलिसांनी कारवाईचे आश्वासन देऊन अखेर भारद्वाजला अटक केली. प्रत्येक कायद्याची पायमल्ली करत भाजपच्या सोयीसाठी कारवाई करणे किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे या दोन्हीमध्ये पोलिसांची भूमिका स्पष्ट दिसते. गुजरातमध्ये पोलिसांनी मुस्लिम तरुणांना मारहाण केल्याच्या दोन ताज्या घटनांचाही येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. पहिली घटना मे २०२६ मधील वेजलपूर, अहमदाबाद येथील आहे. गोहत्येच्या कथित प्रकरणात मोहम्मद अझीझ शेख उर्फ रईस शेख नावाच्या मुस्लिम व्यक्तीला इतरांसह अटक करण्यात आली. एका व्हायरल व्हिडिओमध्ये पोलिस कर्मचारी त्याला पोलिस गाडीच्या बोनेटला बांधून सर्वांसमक्ष काठ्यांनी मारहाण करताना दिसले. त्यानंतर 'मायनॉरिटी कोऑर्डिनेशन कमिटी गुजरात'ने वरिष्ठ सरकारी व पोलिस अधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस पाठवून, हा कायद्याबाहेरचा अमानुष प्रकार असल्याचे नमूद करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. दुसरी घटना नुकतीच ५ सप्टेंबर रोजी भावनगर येथे घडली. एका हत्येतील २० वर्षीय मुस्लिम आरोपी फैजल उर्फ खटकी रफिक लखानी याला गुन्ह्याच्या घटनास्थळाच्या पुनर्निर्मितीसाठी (crime-scene reconstruction) नेण्यात आले होते. तेथे त्याला पोलिसांच्या जीपच्या मागे दोरीने बांधून भरचौकात लाठ्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. धक्कादायक बाब म्हणजे पोलिस निरीक्षक डी. पी. उनाडकट यांनी या कृत्याचे समर्थन करताना म्हटले की, 'समाजात धाक निर्माण करण्यासाठी' आणि पोलिसांवरील जनतेचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी हे आवश्यक होते. यावर 'पीयूसीएल'च्या (PUCL) गुजरात शाखेने दोषी पोलिसांवर कारवाईची मागणी करणारी कायदेशीर नोटीस बजावली आहे. या घटना केवळ कायद्याचे उल्लंघन नसून पोलिसांच्या अनिर्बंध बेमुर्वतखोरपणाचे उघड प्रदर्शन आहेत. पोलिस अनेकदा आपण कायद्याच्याही वर असल्यासारखे वागतात. अशा पोलिसांना कायद्याच्या कक्षेत आणणे जनतेसाठी अत्यंत खर्चिक व दुरापास्त असते, आणि त्यांना शिक्षा होणे तर त्याहूनही दुर्मिळ. जोपर्यंत पोलिस यंत्रणेला राजकीय सत्तेऐवजी केवळ कायद्याला उत्तरदायी बनवले जात नाही, तोपर्यंत पोलिस सुधारणा केवळ दिखाऊच राहतील. न्यायव्यवस्थाही आतापर्यंत यात सपशेल अपयशी ठरली आहे. 'प्रकाश सिंह' खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिलेली 'पोलिस तक्रार प्राधिकरणे' ही कोठडीतील हिंसेसह पोलिसांच्या गंभीर गैरवर्तनाची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी स्थापन केली जाणार होती. परंतु निष्प्रभ अंमलबजावणी, अपुरे अधिकार आणि सरकारी हस्तक्षेपामुळे त्यांची परिणामकारकता पूर्णपणे मोडीत निघाली आहे. पोलिस स्वतःवर झालेल्या अत्याचाराच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी कधीच करू शकत नाहीत. त्यामुळे कोठडीतील हिंसाचार, बेकायदेशीर डांबून ठेवणे, एफआयआर नोंदवण्यास नकार आणि पक्षपाती पोलिसींग यांसारख्या तक्रारी थेट नागरी हक्क कार्यकर्ते आणि निवृत्त न्यायाधीशांचा समावेश असलेल्या, साधनसंपत्तीने सुसज्ज अशा स्वतंत्र प्राधिकरणाकडेच गेल्या पाहिजेत. बदल्या, नियुक्त्या आणि तपासांमध्ये होणारा राजकीय हस्तक्षेप हा पक्षपाती पोलिसिंगच्या मुळांपैकी एक आहे. यावरचा उपाय पोलिसांना लोकशाही नियंत्रणापासून पूर्णपणे मुक्त करणे हा नाही. उलट, हे नियंत्रण पारदर्शक आणि कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादांमध्ये आणणे आवश्यक आहे. प्रकाश सिंह प्रकरणातील सुरक्षा उपाय—पदावरील निश्चित कार्यकाळ, स्वतंत्र तक्रार प्राधिकरणे, तपास आणि कायदा-सुव्यवस्था यांचे विभाजन आणि व्यावसायिक निर्णयांना राजकीय दबावापासून संरक्षण देणाऱ्या संस्थात्मक यंत्रणा हे याचे एक उदाहरण आहे. सामान्य नागरिकांचे शासनयंत्रणेच्या तसेच श्रीमंत आणि शक्तिशाली घटकांच्या अन्यायापासून खऱ्या अर्थाने रक्षण व्हावे, यासाठी पोलिसांवर एक प्रभावी व निष्पक्ष नियंत्रण व्यवस्था निर्माण करणे हा आजच्या घडीचा अत्यंत कळीचा मुद्दा आहे.

**लेखक : आनंद तेलतुंबडे**
**हे पेट्रोनेटचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच IIT खरगपूर आणि GIM, गोवा येथे प्राध्यापक राहिले आहेत.**
**ते लेखक आणि नागरी हक्क कार्यकर्तेही आहेत.**